# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक २०.०१.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शुक्रवार दिनांक २० जानेवारी २००६ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी ३.४५ वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली . सभेला मा.आयुक्त यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०४. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०५. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१०. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
११. स.स.श्री.पाटील अलका रमेश
१२. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१३. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१४. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१७. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१८. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१९. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२०. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२१. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२२. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२५. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२९. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३०. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३२. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग

३३. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३४. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३५. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३६. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३७. स.स.श्री.खान निसार मो.खान
३८. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३९. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४०. स.स.सौ.राऊत छाया विलास
४१. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४२. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४५. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४६. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४७. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४८. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४९. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५०. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५१. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५२. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५३. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५४. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५५. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५६. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५७. स.स.श्री.खुडे विजय किसन
५८. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
५९. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६०. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६१. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६२. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६३. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६४. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६५. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६७. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६८. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६९. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
७०. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७१. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७२. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७३. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७४. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा

७५. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७६. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७७. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७८. स.स.श्री.बारवाल गजानन
७९. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८०. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : स.सदस्य श्री. प्रशांत देसरडा यांच्या आजी स्व.श्रीमती बदामबाई देसरडा यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे त्यांना सभागृहा तर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.गजानन बारवाल
श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : सर्वांनी श्रध्दांजलीसाठी दोन मिनिटे उभे राहावे.

याच वेळी स्व.श्रीमती बदामबाई देसरडा यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.त्रिबंक तुपे :मागिल बैठकीत रॅम्प तोडल्याबध्दल चर्चा झालेली होती व आजच्या सभेत त्या संबधीचा अहवाल मा.आयुक्तांना दयावयाच्या सूचना केलेल्या होत्या. अहवाल आलेला आहे का खुलासा करावा.

मा.महापौर :मा.आयुक्त यांचा अहवाल माझ्याकडे आलेला होता. माझ्याकडे अहवाल दिल्यानंतर या सभागृहाला देण्यासाठी त्यांनी तयार केलेला नाही. मला जो अहवाल दिलेला आहे तोच अहवाल सभागृहात वाचून दाखववावा.

मा.आयुक्त :मागिल सभेत ठरल्याप्रमाणे मा. महापौर यांना तीन दिवसात अहवाल सादर करण्यात आलेला होता. या संबधी शहर अभियंता यांचेकडून माहिती घेतलेली आहे सन ९२-९३ मध्ये रॅम्प साठी २०,३५० रूपये इतका खर्च बांधण्यासाठी लागलेला आहे. वाहन धुण्यासाठी हा रॅम्प होता याचा मागिल १३-१४ वर्षात वापर करण्यात आला नाही.यापूर्वी तेथे एक लहान मुलगी खेळतांना पडून जखमी झालेली होती. जो रॅम्प तोडण्याचे आदेश दिले ते चांगल्या भावनेतून केलेली होती. यात महानगरपालिकेचे कोणतेही नुकसान झालेले नाही कारण १५ वर्षापूर्वीची २० हजार रूपयाचे काम केलेले होते त्याची किंमत आज शुन्य होवून जाते.त्याचा वापर करून घेतलेला नाही प्रश्न हा येतो की. वापर करीत नव्हतो तर ते का बांधण्यात आलेले होते. त्याची चौकशी वेगळी होवू शकते.

श्री.संजय जोशी :२० हजार खर्च करून रॅम्प बांधलेला होता कशाच्या अधारे ही रक्कम काढलेली आहे मूळ संचिका आहे.का?दुसरे असे की मा.महापौर यांनी दुसरा एक स्वतंत्र अहवाल मागविलेला होता. सदर अहवालात काय माहिती आलेली आहे. त्याचाही खुलासा करण्यात यावा.सदर संचिका शोधावी व सभागृहात आणावी. पारदर्शकता असावयास पाहिजे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:कार्यालयाचे रेकॉर्डनूसार मा.आयुक्तांनी माहिती दिलेली आहे.आता या विषयावर चर्चा नको. आणखी चौकशी करायची असेल तर मूळ संचिका कार्यालयात बघायला मिळू शकेल.एकाच विषयावर अनेक वेळ चर्चा करणे बरोबर नाही.

श्री. संजय जोशी : सभागृहात बोलण्याचा प्रत्येक सदस्यांना अधिकार आहे.

श्री.रविकांत गवळी : रॅम्प तोडण्या अगोदर स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली होती किंवा काय हा खूलासा होणे गरजेचे आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : एखादी मालमत्ता पाडायची असेल किंवा अतिक्रमण असेल तर ते पाडण्याचे अधिकार महापालिकेला आहे. जो अहवाल येतो. त्यावरच चर्चा होत असेल तर इतर विषयावर चर्चा होत नाही. काही सदस्यांना या संदर्भात शंका असेल तर त्यांनी प्रशासनाकडे माहिती मागवावी. जो अहवाल आलेला आहे कायदयाप्रमाणे जी कार्यवाही करता येते, त्याप्रमाणे आदेशीत करावे. लहान मोठ्या गोष्टी उकरून आज काय फायदा.

श्री. संजय जोशी : मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियमानुसार कलम ७९ नुसार कोणतीही मालमत्ता पाडण्याचे अधिकार स्थायी समिती सर्वसाधारण सभा किंवा मा.आयुक्तांना आहेत. मा.आयुक्त शिवाय इतर अधिकाऱ्याना हे पाडण्याचे अधिकार नाही. अधिकारासाठी भांडण आहे. मी जे बोलत आहे ते सभागृहाला चूकीचे वाटत असेल तर त्या संदर्भात चर्चा करणे बंद करतो.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :प्रत्येक कामामध्ये कुणाचे तरी अधिकार असतातच. अधिकाराबध्दल असे प्रश्न निर्माण होणारच आहे. या बाबतीत प्रोसीजर किंवा गाईडलाईन ठरवावे .

श्री.कैलास गायकवाड : सभागृहाचा वेळ वाया घालवू नये विकास कामावर चर्चा करावी. विनाकारण अधिकाऱ्यांना धारेवर धरू नका.

मा. महापौर :विषयाला वेगळे वळण देवू नये. रॅम्प पाडण्यापूर्वी मा.स्थायी समिती किंवा मा. आयुक्तांची परवानगी घेतलेली होती का हा विषय चालू आहे यात महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे.कुणाच्या परवानगीने रॅम्प उपआयुक्त महसूल यांनी पाडलेला आहे याचा मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.रविकांत गवळी :महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक होते किंवा नाही.

श्री.सिताराम सूरे : रस्ता दुभाजकावर उभारलेल्या रेलींग ८ मे २००१ रोजी कोणाच्या अधिकारात काढल्या. स्थायी समिती किंवा मा.आयुक्तांची मंजूरी घेतलेली होती का खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर जो विषय सभागृहात चालू आहे त्या विषयी आपले मत मांडावे.

मा.आयुक्त : जी काही कार्यवाही केलेली आहे ती उपआयुक्त महसूल यांनी त्यांचे अधिकारात केलेली आहे. कार्यवाही करण्यापूर्वी माझी परवानगी घेतलेली नाही ही वस्तूस्थिती आहे. वाईट भावना ठेवून कार्यवाही केलेली नाही. ९२-९३ मधे २० हजार रूपये खर्च करून बांधकाम केलेले होते. गुडफेथमध्ये केलेले असेल. यासंबधी उपआयुक्त यांना ताकीद दिलेली आहे व माझी कार्योत्तर मंजूरी घेण्याचे आदेशीत केलेले आहे.

श्री.संजय जोशी :पैशाचा प्रश्न नाही. आमच्या अधिकारांवर गदा आणलेली आहे. सेक्शन ७९ मधे काय आहे. अधिकार कुणाचे होते.

मा.आयुक्त :सेक्शन ७९ हे डिस्पोजल ऑफ प्रॉपर्टी संदर्भाचे आहे. डिमोलेशनसाठी नाही.सेक्शन ७९ मध्ये हे येत नाही असे माझे ठाम मत आहे.शहर अभियंता यांचा रिपोर्टनूसार जी कार्यवाही केलेली आहे ती चांगल्या भावनेतून केलेली आहे असे आहे.

मा.महापौर : मागिल बैठकीत जो निर्णय घेतलला होता त्यात मा.आयुक्तांनी या संदर्भात चौकशी करावी व अहवाल दयावा असा निर्णय दिला होता. महानगरपालिकेने तयार केलेला रॅम्प होता. महानगरपालिकेची मालमत्ता होती.तो रॅम्प उपयोगात होता किंवा नाही हा भाग नंतरचा आहे. अधिकार कुणाचा होता हा प्रश्न आहे.स्थायी समिती समोर ठेवले असते तर मान्यता मिळाली असती परंतू ठेवले नाही. महानगरपालिकेचे कोणतेही नुकसान होवू नये त्यासाठी डेप्यूटेशनवर अधिकारी येथे असतात.आताच मा.आयुक्तांनी खुलासा केला की उपआयुक्त (महसूल) यांनी मान्यता घेतलेली नाही. तर पाडले कुणाच्या अधिकारात.आताच आयुक्त यांनी खुलाशात म्हटले की कार्योत्तर मंजूरी घ्यावी. अधिकारी हे मनमानी करण्यासाठी येथे आलेले आहेत का ?उपआयुक्त (महसूल) यांनी अधिकाराचा गैरवापर केलेला आहे.

श्री.संजय जोशी : २० हजाराची गाडी भंगारात काढायची तर स्थायी समितीची मंजुरी लागते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: उपआयुक्त महसूल यांनी मागिल सभेत दिलगिरी व्यक्त केलेली होती.

श्री.गजानन बारवाल :लॉकबूक बघीतले तर असे दिसून येईल की तेथे वाहने धुतली जात होती. रॅम्प तोडण्यापूर्वी मा.आयुक्त किंवा स्थायी समितीची मान्यता घेतलेली नाही. उपआयुक्त (महसूल) यांचेकडून चूक झालेली आहे. महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. जे नुकसान झालेले आहे ते उपआयुक्त (महसूल) यांचेकडून वसूल करावे व त्यांना त्यांचे विभागाकडे परत पाठविण्यात यावे.

मा.आयुक्त :कार्योत्तर मंजूरीसाठी त्यांनी माझ्याकडे पाठवावे. सेक्शन ६७ सीनूसार कार्यवाही झालेली असेल व माझी खात्री झाली तरच मंजूरी देणार आहे. सेक्शन ७९ मध्ये येत नाही. ६७ (३)(क) मध्ये बसते की नाही याचा निर्णय घेणार.

श्री.संजय जोशी :सेक्शन ६७ सी नूसार जो आपतकालीन घटनेबाबतचा विषय असतो. आपत्कालीन परिस्थिती होती का.

मा.उपमहापौर : हा विषय आर्थिक बाबीशी संबधीत जरी नसेल तरी या महानगरपालिकेत बॉडी आहे लोकप्रतिनिधी आहे. जेथे प्रशासक आहे तेथे प्रशासन त्यांचे अधिकारात निर्णय घेवू शकते. परंतू येथे अधिकारावर गदा आणलेली आहे. उदया कुण्या अधिकाऱ्याना अमूक उपयोगाचे नाही म्हणून पाडले किंवा काढून टाकले असे होवू नये. अधिकारी हे चूका करतात त्यांना पाठीशी कशासाठी घालवायचे. दुसऱ्या एखादया कर्मचाऱ्यानी काही चुका केल्या उपोषणास बसले तर त्यांना निलंबीत केले जाते. एक अधिकारी यांनी चूक केलेली आहे. त्यांचे पाठीशी राहण्याचे प्रशासनाचे कारण काय याचाही खुलासा होणे गरजेचे आहे.

मा.महापौर : सर्व सभागृहाचे मत लक्षात घेता उपआयुक्त (महसूल) यांनी अधिकाराचा गैरवापर केलेला आहे असे दिसते. या संदर्भात मुख्यलेखा परीक्षक श्री.औताडे यांनी महानगरपालिकेचे यात आर्थिक नुकसान झालेले आहे की नाही याचे पूर्ण ऑडीट करावे. तसेच रॅम्प तोडणे जरूरी आहे की नाही मंजूरीची गरज होती की नाही या सर्व बाबतीत चौकशी करावी.व मा.आयुक्तांकडे तसा अहवाल दयावा.त्यात महानगरपालिकेचे जे काही नुकसान झाले असेल.ते मा.आयुक्तांनी उपआयुक्त (महसूल) कडून वसूल करावेत.यानंतर उपआयुक्त महसूल श्री. अरूण आनंदकर यांना सुचना करण्यात येते की त्यांनी त्यांचे अधिकारात राहून अधिकाराचा वापर करावा.सभागृहाचे अधिकार किंवा मा.आयुक्तांचे अधिकाराचा वापर करू नये अशी ताकीद देण्यात येते.

श्री.रविकांत गवळी : अहवाल तयार करतांना वर्ग-४ दर्जाचे कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली. अधिकाऱ्यांना विचारणा केली नाही.

श्री.नारायण कुचे :स्पेक या संस्थेमार्फत मालमत्ताचा सर्वे करण्यात आला.नवीन सर्वेनूसार अनधिकृत बांधकामामूळे अतिरिक्त कर ३०० क्वेअर फूटसाठी ३०००/-रूपये आकारण्यात आलेला आहे.तो जास्तीचा होत असून अतिरिक्त कर रद्य करण्यात यावा. गुंठेवारी नियमित करण्यासाठी जे शुल्क आकारण्यात आलेले आहे तेच घेण्यात यावे.

श्री.शंशाक विसपूते :गुंठेवारी रेग्यूलाईज करण्याची योजना चांगली आहे. नागरीकांची गुंठेवारीत रेग्यूलर करण्याची मानसिकता चांगली असतांना त्या भागातील नागरीकांना रेग्यूलाईज शुल्कासह जमिनीचा अनधिकृत बांधकामाबध्दल अतिरिक्त कर लावण्यात येत आहे.त्यामूळे नागरीकामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे.

मा.महापौर :स्पेक या संस्थेच्या सर्वेच्या माध्यमातून ज्या नोटीसा पाठविण्यात आलेल्या आहे. अशा भागातून दंड आकारणी करून कार्यवाही करावी म्हणून याच सभागृहाचे ठराव घेतलेला आहे. जेथे गुंठेवारी भागाचा सेर्वेचे काम चालू आहे. तेथील नागरीकांना नोटीसा दिलेल्या आहे. जो अतिरिक्त कर लावण्यात येत होता ती कार्यवाही तात्पूरती स्थगित केलेली आहे. गुंठेवारी भाग हा अगोदर रेग्यूलाईज करून घेण्या बाबत प्रशासनास सूचना आहे.

श्री.शंशाक विसपूते :आताच तीन दिवसापूर्वी नोटीसा दिलेल्या आहे. एक ७०० रूपयाची नोटीस तर दूसरी एक नोटीस दिलेली आहे. जो पर्यत लोक गुंठेवारीसाठी पैसे भरणा करीत नाही व गुठेंवारी रेग्यूलाईज करीत नाही तोपर्यत इतर कराच्या नोटीसा देण्यात येवू नये.

श्री. नारायण कुचे :सध्या नागरीकांना तीन प्रकारची कर आकारणी होत आहे. एक अकृषीकर, तसेच गुंठेवारी रेग्यूलर करण्याचे शुल्क व अनधिकृत बांधकामाबध्दलचा कर असे तीन प्रकारचे कराच्या नोटीसा येत आहे. अशा ११७ वसाहती आहेत.यामूळे गुंठेवारी रेग्यूलाईज होणार नाही. नागरीक कोणताच कर भरणा करणार नाही.तीनशे क्वेअर फुटसाठी किमान २० हजार रूपये भरावे लागणार आहे. तो अतिशय जास्त होतो. अतिरिक्त जो कर घेण्याची कार्यवाही होत आहे ती होवू नये रद्य करण्यात यावे.

श्री.संतोष खेंडके : निवासी कर हा ठिक आहे .अनधिकृत बांधकामा बध्दल जो कर लावण्यात येत आहे तो रद्य करण्यात यावा. तोच कर गुंठेवारी रेग्यूलेशन करण्यासाठी आकारला जात आहे.दोन प्रकारचे कर वसूल केल्यास गुंठेवारी रेग्यूलाईज करण्यास अडचण येईल.

डॉ. भागवत कराड :या शहरात बराच भाग हा अनधिकृत वसाहतीत येतो. आणि त्या वसाहतीना गुंठेवारीच्या माध्यमातून रेग्यूलाईज करणार आहोत. जे शुल्क निश्चित केले असेल ते घेणार आहोत. परंतू अशा भागात ६०० क्वेअर फुटसाठी ज्यांनी अनधिकृत बांधकाम केले त्यांना २६२४ रूपयाच्या नोटीसा देण्यात येत आहे. हा वाजवीपेक्षा जास्त कर आकारणी होत आहे. त्यामूळे मोठया रक्क्मा नागरीक भरू शकणार नाही. व एक प्रकारचा अन्याय होईल व जी महापालिकेस वसूली होणार आहे ती होणार नाही. त्यामूळे जो डबल कर रद्य करण्यात यावा.

श्री.मुजीब खान :जो कर लावण्यात येत आहे व वसूली करणारे कर्मचारी हे नागरीकांना मोठया प्रमताणात त्रास देत आहे. जून्या मालमत्ता कर धारकांना पून्हा नवीन कराच्या नोटीसा देण्यात येत आहे. मोठया घरासाठी २२ हजार तर लहान घरासाठी ४७ ते ४८ हजार रूपये कर लावण्यात येत आहे. व कमी करायचे असेल तर २० हजार

रूपयाची मागणी करीत आहे. हा प्रकार अनेक वार्डात चालू आहे. माझ्या वार्डात आठ ते दहा प्रकरणे झालेली आहे. जुन्या मालमत्तेस नवीन कर कशाच्या अधारे लागू होतो याचा खुलासा करावा.

मा.महापौर : मा.आयुक्त यांनी या संदर्भात खुलासा करावा.

मा.आयुक्त : अनधिकृत बांधकामासाठी १२० रूपये प्रति क्वेअर मीटर प्रमाणे आकारणी केलेली आहे. हा कर सभागृहाच्या मान्यतेनेच आकारण्यात आलेला आहे.हा कर कायम स्वरूपी नाही. दोन प्रकारचे अनधिकृत बांधकाम आहे की जे गुंठेवारीत रेग्यूलाईज होवू शकतील काही होवू शकणार नाही. जे २००१ च्या नंतरचे आहे. अनधिकृत बांधकाम कराणाऱ्यांना कर लावण्यात आला पाहिजे हे सभागृहाचा निर्णय आहे जे की त्या लोकांनी विकास कर भरलेला नाही. त्यामूळे १२० रूपये आकारणी केली पाहिजे असे सभागृहाने मान्यता दिलेली होती. जे रेग्यूलाईज होणार नाही त्यांना हा कर दयावा लागेल तसेच जे रेग्यूलाईज होईल त्या नागरीकांना जे सभागृहाने १४५ रू. निश्चित केलेले आहे. ते रेग्यूलाईज करण्यासाठी दयावे लागतील. व १२० रू.प्रती चौ.मी. असे एकूण २६५ रूपये प्रती चौ.मी. हे दयावे लागतील. जो भाग रेग्यूलाईज होणार नाही त्यांनी फक्त १२० रूपये प्रमाणेच दयायचे आहे. कारण अशा मालमत्ता धारकांनी विकास कर काहीही दिलेला नाही. रेग्यूलर इमारत बांधकामासाठी २०० रूपये प्रति क्वेअर मीटरसाठी आकारणी होते. जर अनधिकृत बांधकाम केलेले असेल व ते रेग्यूलाईज करायचे असेल तर २०० पेक्षा जास्तच रक्क्म भरावी लागेल यात ६५ रूपये दंड म्हणून आहे व २०० रूपये हे रेग्यूलाईज करण्यासाठीचे आहे.व ते योग्य आहे.

श्री.मुजीब खान :यापूर्वीही चर्चा झालेली होती की गुंठेवारीत कोणता भाग येतो.त्याचा अगोदर खुलासा करावा जो जुना भाग येत नाही तेथे विकास कामे करता येतील. जुने जे शहरातील भाग आहे. ते गुंठेवारी येण्याचा प्रश्नच येत नाही. परंतू आजही सर्वच अधिकारी कोणतेही विकास काम करतांना तो भाग गुंठेवारीत आहे म्हणून सांगातात. मी सुध्दा पत्र दिलेले होते. हा भाग गुंठेवारी येतो म्हणून प्रशासनाकडून सदस्यांना उत्तर येते. माझ्याकडेही तसे दोन पत्र देवून उत्तर दिलेले आहे.दोन चार दिवसापूर्वीच मिळालेले आहे. रस्त्यांच्या संदर्भात आहे.

मा.महापौर : दोन कोणते भाग आहे त्या संबधी मा. आयुक्तांना माहिती दयावी. तो भाग गुंठेवारीत येतो की नाही या बाबत प्रशासन माहिती देतील.गुंठेवारी भागातून २० लक्ष रूपये जमा झालेले आहे. ते गुंठेवारी भागातच वापरण्यात येणार आहे.

श्री.मुजीब खान : जूना जो भाग आहे तो गुूंठेवारीत येत नाही. तेथे विकास कामे करण्यास हरकत नाही. परंतू कामे होत नाही. गुंठेवारीत हा भाग येतो म्हणून पत्राद्वारे आम्हाला कळविले जाते. नवीन काम होण्या संदर्भात मी पत्र दिलेले होते.त्यासाठी कोणता भाग गुंठेवारीत येतो व कोणता येत नाही. याचा बोध होत नाही.

मा.आयुक्त : माझ्याकडे वसाहतींची नावे दयावी तो भाग गुंठेवारीत येतो किंवा नाही लेखी उत्तर दिले जाईल.

डॉ.भागवत कराड : जवळपास २५ ते ३० नगरसेवक हे अनधिकृत वस्तीतून निवडून आलेले आहे. या भागात एकतर कोणतेही विकास काम करता येत नाही. गुंठेवारीच्या माध्यमातून कार्यवाही होत आहे. पून्हा कर लावण्यात येत आहे. नागरीकांना नोटीसा देण्यात आल्या त्यात असे दिले की अतिरिक्त बांधकाम केल्या बाबतचा कर तोसूध्दा मोठया प्रमाणात आहे. मागिल सर्वसाधारण सभेत जरी निर्णय घेतलेला असेल तरी तो निर्णय बदलण्याची गरज आहे. अनधिकृत वसाहतीत जे गुंठेवारी भागात

राहतात त्या लोकांवर एक प्रकारचा अन्याय करीत आहोत. त्यासाठीजो अतिरिक्त कर आहे तो रद्य करावा. तसा निर्णय देण्यात यावा. या सभेत निर्णय घेता येत नसेल तर येणाऱ्या सभेत घेण्यात यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : गावठाण तसेच स्लम भाग गुंठेवारीत येत नाही. दुसरे असे काही भागात एनआरव्ही बदलता येणार नाही ते एनआरव्हीत बदल होत नाही तर कशाच्या अधारे कर वाढविण्यात आला. जुना जो कर होता त्याप्रमाणे कर राहिल परंतू काही मालमत्ताना नवीन टॅक्स आकारण्यात आलेला आहे.१२० रूपये प्रमाणे घेण्याचा सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. तीन महिण्यानंतर ठराव सादर करून तो कर रद्य करावा परंतू आज त्यास स्थगिती दयावी.

श्री.नासेर नहदी : गुंठेवारी भागात कोणतेही विकास काम होत नाही. वार्ड क्र ५ मध्येही बराच भाग हा गुंठेवारी मध्ये येत आहे. यापूर्वी तेथे विकास कामे झालेली आहे.स्थायी समिती तसेच सर्वसाधारण सभेत या भागात देखभाल दुरूस्तीची सूध्दा कामे होत नाही.वार्डात अनेक देखभाल दुरूतीची कामे आहेत. ड्रेनेज लाईन फुटलेली आहे. लोकांच्या घरात घाण पाणी जात आहे.एक ते दोन महिण्यापासून ही परीस्थिती आहे. पत्र देवूनही काम केले जात नाही.संबधीत वार्ड अधिकारी तसेच अभियंता हा भाग गुंठेवारीत येत असल्याने काम करता येत नाही असे सांगतात.परंतु या भागात नागरीकांना कर भरण्या बाबत नोटीसा दिल्या जात आहे. काही लोकांनी सन २००६ पर्यतचा संपूर्ण कर भरणा केलेला आहे पुन्हा महानगरपालिकेने त्यांना नोटीसा दिल्या जात आहे. याचा अर्थ जो सर्वे करण्यात आलेला आहे तो बोगस व चूकीचा झालेला दिसून येतो. याची चौकशी व्हावी तसेच गुंठेवारी भागात देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात यावी अशी विनंती आहे.

सौ. अजरा जबीन खान : वार्ड क्र २७ मधे ८० टक्के भाग हा अनधिकृत वसाहतींचा आहे. पूर्वी वार्डात विकास कामे केलेली आहे त्यावर देखभाल दुरूस्तीची कामे सुध्दा होत नाही.कोणता भाग अनधिकृत आहे कोणता अधिकृत आहे याची माहिती देण्यात यावी. कोणती कामे होवू शकतात कोणती होवू शकत नाही याचाही खुलासा करण्यात यावा.पत्र देवूनही कामे होत नाही अनधिकृत भाग आहे म्हणून माहिती दिली जाते.

मा.महापौर : मागिल बैठकीत या विषयावर चर्चा झालेली होती. मा.आयुक्त यांनी विभाग प्रमूख यांना गुंठेवारी भागात देखभाल दुरूस्तीची कामे करण्याचे आदेश दिलेले आहे. ती कामे आता प्रलबिंत राहणार नाही.

श्री.मुजीब खान : निवडून येवून ८ ते ९ महिणे झाले आतापर्यत वार्डात कोणतेही विकास कामे झालेली नाही.दोन ते तीन महिने शिल्लक आहे. याचे कारण काय योग्य खुलासा होणे गरजेचे आहे. आतापर्यत वसूली किती झालेली आहे. किती कामाचे टेंडर काढण्यात आलेले आहे व किती कामांना सुरूवात झालेली आहे व कोणत्या भागात ती कामे चालू आहे जर वसूली नसेल तर महानगरपालिकेकडे पैसा नाही त्यामूळे विकास कामे होत नाही हे जनतेसमोर यावयास पाहिजे.विकास कामे होत नाही यात नगरसेवकांची बदनामी होत आहे अनेक रस्त्यावर खड्डे पडलेले आहे. ड्रेनेज लाईन फुटलेल्या दिसून येत आहे. याचाही खूलासा होणे गरजेचे आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जो विकास आराखडा आहे त्यावर कोणता भाग गुंठेवारीत येतो हे दाखवून दयावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :अत्यंत संथ गतीने प्रशासन काम करीत आहे. गुंठेवारी भागातील जनता पैसे भरण्यास तयार आहे. प्रतिसाद मिळत नाही.यास जबाबदार कोण आहे.आतापर्यत बजेट मधील कामांना सुरूवात झालेली नाही.उशीर का होत आहे नागरीकांना

नुसते आश्वासन दिले जात आहे. परंतू कोणतीही कामे होत नाही. यास जबाबदार कोण आहे याचा खुलासा करावा.

(याच वेळी मा.महापौर यांचे आसनवर मा.उपमहापौर हे आसनग्रहन करतात.)

डॉ.भागवत कराड :शहरात एकूण ११७ वसाहती आहे तेथे गुंठेवारी कायदयानूसार कार्यवाही होणार आहे. जवळपास ३० स. नगरसेवक गुंठेवारी भागातून निवडून आलेले असून गुंठेवारीच्या संदर्भात जी चर्चा होत आहे त्यावर योग्य तो विचार करावा.जो कर जास्तीचा लावण्यात आलेला आहे तो कमी करावा .

सौ. संगिता जाधव :ज्या ज्या गुंठेवारीच्या भागातून नागरीकांनी पैसे भरणा केलेले आहे त्या भागात कामे करण्यात यावी.

श्री.कोकाटे काशिनाथ :गुंठेवारी भागात कामे करण्यास चालना मिळत असतांना पून्हा त्यावर चर्चा करण्याची वेळ येत आहे. यात अकृषीकर, गुंठेवारी रेग्यूलाईजसाठी शुल्क व जो अनधिकृत बांधकाम असल्या बाबत केलेला दंड या तीन ही प्रकारे कर आकारणीची कार्यवाही होत आहे. सर्वाच्या भावना लक्षात घेता स्पेक या संस्थेच्या माध्यमातून ज्या नोटीसा नागरीकांना पाठविण्यात आलेल्या आहेत जो अतिरिक्त कर लावण्यात आलेला आहे तो रद्य करावा गुंठेवारी रेग्यूलाईज संदर्भात संपूर्णत: कार्यवाही झाल्यानंतर त्यावर निर्णय घ्यावा. व पाच हप्त्यात ते वसूल करण्यात यावे. जो भाग गुंठेवारीत येत आहे त्या भागात गुंठेवारी राबविण्यासाठी स. सदस्यांनी सुध्दा प्रयत्न करावेत.जेणे करून नागरीकांसाठी विकास कामे करता येतील.

मा.महापौर :गुंठेवारी भागात जो सर्वे केलेला आहे ज्या नोटीसा दिल्या जात आहे त्यात जो दंड म्हणून रक्कम आकारणी होत आहे. तो दंड कूणी भरणा केला असेल तो गुंठेवारी मध्ये ॲडजेस करू अशा प्रशासनास सूचना करण्यात येत आहे. व प्रशासनाने त्याप्रमाणे काम करावे.

मा.आयुक्त :जवळपास गुंठेवारी भागात २० हजार घरांचा सर्वेचे काम झालेले आहे त्या मालमत्ता धारकांना नोटीसा देण्यात येत आहे. की त्यांनी ३० दिवसांच्या आत संचिका तयार करण्यासाठी पैसे भराणा करायचे आहेत. एक नोटीस दिली दुसरी दिली तरीही लोकांनी पैसे भरणा केले नाही तर १२ टक्के दंड आकारण्यात यावा. जेणे करून गुंठेवारीत रेग्युलाईज करण्यासाठी नागरीक पूढे येतील.

श्री.महेश माळवतकर :काल मुंबईला सिडको हस्तांतर संदर्भात बैठक झाली त्या बैठकीला मा.आयुक्त उपस्थित होते. सदर बैठकीत काय चर्चा झालेली आहे त्या संदर्भात सभागृहाला माहिती देण्यात यावी.

श्री.कवरसिंग बैनाडे :सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले अशी चर्चा ऐकावयास येत आहे. बैठकीमधे निश्चित काय चर्चा झालेली आहे मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.महापौर :सिडको हस्तांतरण संदर्भात काल मुंबईला जी बैठक झाली त्या बैठकीला मा.आयुक्त उपस्थित होते. अधिकाऱ्याबरोबर काय चर्चा झालेली आहे त्याचा खुलासा मा.आयुक्त यांनी करावा त्यानूसार योग्य तो निर्णय सभागृह घेईल.

मा.आयुक्त :सिडको हस्तांतरणाच्या बाबतीत शासनाने चार पाच वर्षापूर्वी एक जी.आर काढलेला होता. त्यात सिडको ४.५० कोटी रूपये देतील व हस्तांतरण करून घ्यावे. त्यात १० बाबी नमूद केलेल्या होत्या एकाच बाबीवर सिडकोशी चर्चा केलेली होती की ४.५० कोटी देण्या ऐवजी १० कोटी देण्यात यावे.वाटाघाटी यासाठीच होती की सिडको किती रक्क्म महानगरपालिकेस देण्यास तयार आहे. कालच्या चर्चेत नगरविकास सचिव तसेच सिडकोचे कार्यकारी संचालक

महानगरपालिकेच्या वतीने मी उपस्थित होतो. शेवटच्या स्टेजपर्यंत निगोशिएशन आलेले आहे. चर्चे अती असे झाले की महानगरपालिका १५ कोटीपवर्यंत रक्क्म घेण्यास मान्य करीत असेल तर कार्यवाही करता येईल.परंतू मी असे म्हटलेकी यासाठी अगोदर सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागेल. १५ कोटी मिळत आहे ही रक्क्म बरोबर आहे. कालच शासनाने महानगरपालिकेला ३ कोटी रिलीज केलेले आहे. तसेच २५ कोटी रूपये महानगरपालिकेला देणार आहे जी.आर तयार आहे परंतू त्यात अशी अट आहे की जेव्हा सिडको हस्तांतर होईल तेंव्हाच दिले जाईल. १५ कोटी देवू इच्छितात. ही रक्क्म बरोबर आहे. सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर तसे लेखी कळविण्यात येईल.

मा.महापौर :२५ कोटी जी रक्कम आहे. ती मराठवाडा एकात्मिक जी योजना होती.शासनाने अट टाकलेली होती की सिडको हस्तांतरण केल्याशिवाय ही रक्क्म मिळणार नाही. या शहरासाठी मिळेल ही निश्चीत आहे.

मा.आयुक्त :२५ कोटी हे महानगरपालिकेसाठीच देणार आहे परंतू सिडको जेंव्हा हस्तातंरण करून घेतल्याशिवाय देणार नाही.

श्री.बन्सीधर गांगवे :सिडकोकडून महापालिकेस जी रक्कम येईल ती सिडको भागासाठीच खर्च करावी

श्री.कवरसिंग बैनाडे :१५ कोटीत सिडको मधील विकास कामे होतील का याचाही खुलासा करावा.

डॉ.भागवत कराड :सन २००१ मधे जी.आर काढलेला होता. त्यामधे जी काही रक्कम असेल ती तसेच सिडकोची इमारत व प्रशासकीय इमारत सुध्दा मिळणा होती.तसेच ज्या खुल्या जागा आहेत त्या मिळाणार होत्या तसेच लेआऊट मंजूर करण्याचे अधिकार देणार होते. ज्या गाईड लाईन्स ठरलेल्या होत्या त्यानूसार हस्तांतरण व्हावे. नसता या संदर्भात सर्वसाधारण सभा आयोजीत करावी नंतर निर्णय घेण्यात यावा.

मा.महापौर :सिडको महानगरपालिकेस १५ कोटी देण्यास तयार असेल आयुक्तांनी त्याप्रमाणे कार्यवाही करून परत या सभागृहासमोर ठेवावे. हस्तांतरण करण्याची सभागृहाची तयार आहे.

श्री.कवरसिंगबैनाडे :सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण व्हावे सर्वांचीच इच्छा आहे. परंतू जी रक्कम मिळणार आहे ती सर्व सिडको भागातच विकास कामासाठी वापरण्यात यावी .

श्री.वसंत नरवडे :ही सूचना स.सदस्याची योग्य आहे का ?आतापर्यंत पाणीपूरवठासाठी सिडकोत महानगरपालिकेने खर्च केलेले आहे. सिडकोलासाठी ही महानगरपालिकेने केलेली मदतच आहे.

सौ.रजनी जोशी :सिडकोचे हस्तातंरण झाले पाहिजे. जेंव्हा हस्तातंरण होईल तेंव्हापासून सिडकोचा जो कर होता त्याप्रमाणे आकारण्यात यावा. ज्या अटी शर्ती ठरलेल्या होत्या त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी तसेच जी रक्कम सिडकोकडून येईल ती सिडको भागासाठीच खर्च करावी.

श्री.मुजीब खान :हस्तातरंण करण्यास कूणाचा विरोध नाही. सिडको हे एक नाव दिलेले आहे तो भाग सूध्दा या औरंगाबाद शहराचाच भाग आहे. जो की शासनास तो विकसीत करण्यासाठी दिलेला होता. हा भाग वेगळा नाही.राहणार सूधदा नाही. हस्तातरंण होईलच यात शंका नाही.प्रशन हा की जी जागा दिलेली होती जिल्हाधिकारी यांनी भूंसपादीत केलेली होती. व जो विकास आराखडा तयार केलेला होता त्यानूसार उदयान होते ओपन स्पेस होत्या खूली जागा होती. शाळेसाठी जागा होती हस्तातंरण करतेवेळी हे पहावे लागेल की त्या संपूर्ण जागा अबाधित आहेत का की त्यावर अतिक्रमण झालेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे सिडकोने मोठमोठया

लोकांना जागा दिलेल्या आहे. विक्री केलेल्या आहेत.१९९४ ला एक बैठक घेण्यात आलेली होती त्यावेळी गौतम साहेब होते. त्यावेळी हस्तातरणास विरोध केलेला नव्हता. जी जागा विकसीत करण्यासाठी दिलेली होती बऱ्याच जागेवर अतिक्रमण झालेली आहे.त्या बैठकीला सिडकोचे कोणीही अधिकारी नव्हते. या बाबतीत योग्य खुलासा करण्यास ते असमर्थ होते म्हणून बैठकीला आलेच नाही. यासाठी विशेष सभा आयोजित करावी. विकास आराखड्यानूसार सिडको महानगरपालिकेकडे हस्तांतरण करावे.

श्री.कोकाटे काशिनाथ :शासनाकडून परीपत्रक आलेले आहे. जे काही मराठवाडा एकात्मिक योजने अंतर्गत २५ कोटी देण्यासाठी सिडको हस्तातरणाची अट घातलेली आहे. जे जाणिवपूर्वक केलेले आहे जी रक्क्म शासनाने मंजूर केलेली होती ती विना अट देणे गरजेचे होते. काल मा.आयुक्त बैठकीला गेले होते. त्या बैठकीची माहिती आताच त्यांनी दिलेली आहे. सन २००० मध्ये हस्तांतरण करण्या संदर्भात चर्चा झालेली होती व हस्तांतरण करण्यास मान्यता दिलेली होती परंतू त्यावेळची रस्त्याची परीस्थिती तसेच सिडकोची भौगालिक परीस्थिती बघून त्यावेळी केलेला करारास मान्यता दिलेली होती. संपूर्ण प्रक्रिया झालेली होती.आज २००६ वर्ष सुरू झालेले असून सहा वर्षा होत आहे. त्यावेळच्या सुविधा व आजच्या सुविधेमधे फार मोठा फरक झालेला आहे. रस्त्याची अवस्था बिकट ड्रेनेजची अवस्था बिकट झालेली आहे.आणि सर्व सुविधा विस्कळीत झालेल्या असून आता जास्त खर्च लागणार आहे. जेंव्हा स्व. बाळासाहेब पवार यांचे पुर्णाकृति पूतळयाचे अनावरण झाले त्यावेळी या राज्याचे मुख्यमंत्री यांनी मा.महापौर यांना विकास कामे करण्यासाठी आम्ही तुमच्या पाठीशी आहोत असे आश्वासन दिलेले आहे. पूर्वीच्या करारनाम्यात ज्या मागण्या होत्या त्यात सिडकोने लिजडिडचे फ्रिहोल्ड करण्याचे सिडकोने करार करावा त्यानंतर जो निर्णय मत्रिमंडळात होईल तो मान्य राहिल त्याचप्रमाणे खुल्या जागा. प्लॅनींग अथॉरेटी,नाटयगृह, जलतरणसाठी विनामूल्य जागा तसेच लेआऊटची संपूर्ण रेकॉर्ड व ते देण्याचा अधिकार संपूर्ण महानगरपालिकेस असेल.व हस्तातंरण झाल्यानंतर विकास करण्याचा अधिकार तसेच वसूली करण्याचा अधिकार सिडकोला राहणार नाही. यासर्व अटी शर्ती होत्या सिडकोची जी ५० टक्के इमारती या जळगाव रोडला लागून आहे. जे हॉस्पीटलचे बांधकाम केलेले आहे त्यासह तसेच संपूर्ण सभागृह तसेच विकसीत केलेले वाचनालय तसेच एन ४ चे क्रिडांगण हे सर्व देण्याचे महानगरपालिकेला मान्य केलेले आहे. या सर्व अधिकाराचे सिडकोने पालन करून आजच्या बैठकीत नाविलाजाने का होईना सिडको हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात यावी अशी विनंती आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जो विकास आराखडा होता त्यानूसार हस्तंातरण झाल्यानंतर विकास करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहिल.कार्यालयाची इमारत महानगरपालिकेकडे येईल. फक्त ज्या ओपन प्लॉट आहे ते मिळणार नाही. १५ कोटी येतील ते सिडकोमधे खर्च करावे शासनाकडून २५ कोटी येतील ते शहरासाठी खर्च करावे.

श्री.गजानन बारवाल :सिडकोच्या ज्या ज्या इमारती असतील,उदयान तसेच मैदान व खुल्या जागा महानगरपालिकेकडे येतील.तसेच सिडकोतील कर्मचारी वर्ग घेणार आहोत का. सिडकोतील सर्व स.सभासदाच्या भावना लक्षात घेवून जी रक्कम महापालिकेस मिळेल ती खर्च करण्यास हरकत नसावी व आजच्या बैठकीस यास मान्यता दयावी ही विनंती.

श्री.कवरसिंग बैनाडे :सिडकोचे महानगरपालिकेस हस्तांतरण करण्यास सर्वांची मान्यता आहे. जे काही करारनामा व इतर अधिकार घ्यायचे त्या बाबतीत मा.महापौर व मा.आयुक्तांनी योग्य तो निर्णय घ्यावा.आम्ही आपणांस अधिकार देतो.

मा.महापौर :सिडकोकडून १५ कोटी घेवून जून्या करारनूसार जे काही किरकोळ बदल करावयाचे असतील मा.आयुक्त पदाधिकारी एकत्रित बसून हे बदल करू व सिडको हस्तातरण करण्यास मान्यता देण्यात येते.

श्री.कैलास गायकवाड :भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहे आंबेडकर या बध्दल उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. मुलायसिंग यादव यांनी जे अपशब्द वापरले त्या बध्दल निषेधाचा ठराव मंजूर करण्यात यावा.

मा.महापौर : सभागृहाच्या वतीने निषेध करण्यात येतो.

श्री.महेश माळवतकर :निवडून येवून १० महिने झालेली असतांना जी अर्थसंकल्पात असलेली कामे ती होत नाही. ती होणार आहे की नाही. याचा खुलासा घ्यावा. किंवा विकास कामे करण्या संदर्भात तसे प्रशासनास आदेशीत करावे.

**विषय क्र. १४२/१ :**

दि.१०.१.२००६च्या स्थायी समिती सभेतील ठराव क्र.१७१ अन्वये औरंगाबाद शहरातील काही मुख्य रस्ते तसेच महत्वाचे विकास योजना रस्ते Deffered Payment धर्तीवर रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी प्रस्तावित रस्त्यांचे सर्वेक्षण करणे, तसेच रस्त्याचे IRC व IS तसेच तत्सम कोडप्रमाणे डिझाईन करणे, कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, तसेच निविदापूर्व व निविदा काढल्यानंतर सर्व प्रक्रियेत महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार म्हणून काम पहाणे, यासाठी श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि. मुंबई यांना PMC म्हणून नेमणूक करण्यास तसेच प्रस्तावित रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तथापी सर्वच रस्त्यांचे काम खाजगी संस्थेमार्फत न करता महापालिकेच्या अभियंत्यामार्फत कामे करण्यात यावीत. अशी मंजूरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात आलेली आहे.

स्थायी समिति सभेतील मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे-

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील काही मुख्य रस्ते तसेच महत्वाचे विकास योजना रस्ते Deffered Payment धर्तीवर रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे (डांबरी रस्ते) प्रस्तावित आहे.

प्रस्तावित रस्त्यांचे सर्वेक्षण करणे, तसेच रस्त्याचे IRC व IS तसेच तत्सम कोडप्रमाणे डिझाईन करणे, कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, तसेच निविदापूर्व व निविदा काढल्यानंतर सर्व प्रक्रियेत महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार म्हणून काम पहाणे, यासाठी मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या दालनात दि.५.१०.२००५ रोजी PMC चे प्रतिनिधी हजर होते. सदर बैठकीत सर्व प्रतिनिधींना त्यांच्या फर्मची माहिती तसेच कामाच्या अनुभवाबाबत माहिती असलेली पुस्तिका सादर करण्याबाबत सुचविले. त्यानुसार श्रीखंडे कन्सल्टंट, मुंबई व सनग्रेस इंजिनियरींग प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांनी त्यांच्या फर्मची माहिती व अनुभवाबाबत माहिती पुस्तिका सादर केलेली असून सदर माहिती पुस्तिकेवरून श्रीखंडे कन्सल्टंट मुंबई, यांना रस्ते बांधकामाकरीता PMC म्हणून भरपुर अनुभव दिसून येतो. सनग्रेस इंजिनियरींग प्रोजेक्ट प्रा.लि. यांना पाटबंधारे कामाचा भरपूर अनुभव आहे. या बाबी विचारात घेता श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि. मुंबई यांना PMC म्हणून नेमणूक करणे योग्य राहील.

Deffered Payment धर्तीवर खालील रस्त्यांचे डांबरीकरण (डांबरी रस्ते) करण्याचे प्रयोजन आहे. सदर रस्त्यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नांव | अंदाजे लांबी (मीटर) |
|---|---|---|
| १ | एकता चौक ते सुतगिरणी चौक (८०' रूंद रस्ता) | ११०० |
| २ | पीरबाजार ते एकता चौक (८०' रूंद रस्ता) | १२०० |
| ३ | हॉटेल पंचवटी ते कोकणवाडी (८०' रूंद रस्ता) | ७५० |

| | | |
|---|---|---|
| ४ | सावरकरचौक (टिळकनगर) ते जवाहरनगर पोलीस स्टेशन(८०' रूंद रस्ता) | १४०० |
| ५ | शहागंज चमन सभोवतालचा रस्ता (८०' रूंद रस्ता) | ५०० |
| ६ | रोशनगेट ते सेंट्रल जकात नाका (१००' रूंद रस्ता) | ९५० |
| ७ | समर्थनगर ते सिल्लेखाना (८०' रूंद रस्ता) | ९०० |
| ८ | क्रांतीचौक ते पैठणेट (१००' रूंद रस्ता) | १००० |
| ९ | मोंढानाका ते जाफरगेट (८०' रूंद रस्ता) | ८०० |
| १० | बीबीका मकबरा ते टाऊन हॉल (१००' रूंद रस्ता) | ११०० |
| ११ | आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक | ७०० |
| १२ | एस.एस.सी.बोर्ड ते पीरबाजार (५०' रूंद रस्ता) | ७०० |
| १३ | हॉटेल वेदांत ते आनंद गाडे चौक (८०' रूंद रस्ता) | ९०० |
| १४ | रंगारगल्ली रस्ता (५०' रूंद रस्ता) | ७०० |
| १५ | पैठणगेट ते सिटीचौक व्हाया रंगारगल्ली रस्ता | |
| १६ | सिटीचौक ते गुलमंडी-गोमटेश मार्केट ते पैठणगेट रस्ता | |
| १७ | औरंगपुरा बाराभाई ताजिया ते मिल कॉर्नर रस्ता | |
| १८ | सेव्हनहिल ते गजानन महाराज मंदिर रोड ते सूतगिरणी रस्ता | |
| १९ | एम.जी.एम. - सिडको ते लक्ष्मणचावडी रस्ता | |
| २० | दमडीमहल कलेक्टर ऑफीस ते एसएफएस जालना रोड व्हाया चंपा मस्जीद रस्ता | |
| २१ | हर्सूल कारागृह ते हर्सूल तलावा पर्यन्त रस्ता | |

उपरोक्त रस्त्यांचे Deffered Payment धर्तीवर डांबरीकरण करण्याकरीता अंदाजे रू.२३ कोटी एवढा खर्च येईल व काम पूर्ण झाल्यानंतर काम करणाऱ्या कंत्राटदारास प्रत्येक वर्षी खालीलप्रमाणे एकूण खर्चाच्या खालील टक्केवारीप्रमाणे रक्कम देण्यात येईल.

| | |
|---|---|
| प्रथम वर्ष | ३०% |
| दुसरे वर्ष | ३०% |
| तिसरे वर्ष | ४०% |

तरी PMC ची नेमणूक करण्यासाठी तसेच नियोजित डांबरीकरण रस्त्याच्या नावांना मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता मिळणेकरीता मा.स्थायी समितीमार्फत प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

डॉ. भागवत कराड : यामध्ये काही आवश्यक त्या रस्त्याचा समावेश करण्याची गरज आहे. सतिष मोटार ते महात्मा फुले पुतळा पर्यत तसेच टेलीफोन एक्सचेंज ते सेवायोजन कार्यालयापर्यत रस्ता असे दोन रस्त्याचा समावेश करण्यात यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:प्रस्तावात ३० टक्के, ४० टक्के प्रमाणे काम दर वर्षी करणार असेल तर महानगरपालिकेच्या वतीने सुध्दा करता येईल बजेट मध्ये तरतूद करावी. व्याज जाणार नाही. इतर चार्जेस ही लागणार नाही. डिफर्ड पेमेन्टवर हे काम केले तर पूढील बजेटमधे रक्कम राहणार नाही. जी तरतूद रस्त्यासाठी ठेवणार ती या एजन्सीला दयावी लागेल. अशा पध्दतीने काम करण्यास मान्यता देवू नये,वगळावे. दरवर्षी ३०% रस्ते घ्यावे.

श्री.संजय जोशी :आजच्या सभेच्या विषय पत्रिकेसोबत इतिवृत्त देण्यात आलेले नाही.

मा.महापौर :या संदर्भात नगरसचिव यांचेशी चर्चा झालेली होती. त्यांचेकडे व्हीजन २०२५ चे काम चालू होते. त्यामूळे इतिवृत्त देवू शकलेले नाही. पूढच्या बैठकीच्यावेळेस इतिवृत्त दिले जाईल.

| | |
|---|---|
| श्री.संजय जोशी | :व्हीजन २०२५ चे काम मा.आयुक्तांनी दिले की मा.महापौर यांचे परवानगी दिले होते.तसेच सचिव यांचेकडे स्टेनो कर्मचारी वर्ग कमी असेल तर देण्यात यावे. |
| मा.महापौर | :या संदर्भात मा.आयुक्ताबरोबर चर्चा करून सचिव यांचेकडे संपूर्ण जबाबदारी सोपविलेली होती.इतिवृत्त वेळेवर तयार होण्याच्या दृष्टीनेमा. आयुक्त यांनी सचिव यांना एक स्टेनो कर्मचारी देण्यात यावे. |
| सौ. लता दलाल | :पूढील सभेत जेंव्हा इतिवृत्त येईल. त्यास सम्मती घेतल्याशिवाय कायम करू नये. दुसरे असे की. सचिव यांना त्यांचे विभागाचे काम अगोदर प्राधान्याने करू दयावे. इतर कामे दिली तर इतिवृत्त मिळत नाही. |
| सौ. कला बोरामणीकर | :निराला बाजार ते अदालत रोड तसेच सेवायोजन कार्यालय ते टेलीफोन कार्यालय पर्यतच्या दोन रस्त्याचा यात समावेश करण्यात यावा. |
| श्री.सिताराम सूरे | :यात २३ कोटीचा खर्च अंदाजित ठेवलेला असून एकूण २१ रस्ते आहे. व १४ रस्त्याची लांबी रूंदी दाखविण्यात आलेली आहे. १४ रस्त्याची लांबी अंदाजे १३ कि.मीटर होते. उर्वरीत ७ रस्त्याची लांबी किती होवू शकेल. व १४ रस्त्याची जी लांबी दाखविलेली आहे त्यासाठी अंदाजे खर्च हा माझ्यामाहिती नूसार ६ कोटीचा होवू शकेल.शिवाय हे रस्ते चांगल्या स्थितीत आज आहे. जास्त खर्च लागणार नाही. असे असतांना २३ कोटी रक्कम ही कशाच्या अधारे ठेवलेली आहे. याचा खुलासा करावा. |
| डॉ. भागवत कराड | :महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग असेल एमएसआरडीसी असेल दोन्ही विभागाचे दर घेतले तर साधारणत: एक किलो मिटर रस्ता जो ८० फुट रूंद आहे यासाठी ५० लक्ष खर्च येतो. यात फक्त १२ कि. मीटर लांबीचे रस्ते दिलेली आहे. याचा विचार करता फक्त सहा कोटी खर्च येतो.तसेच यातील काही रस्ते चांगल्या स्थितीत आहे.थोडया फार प्रमाणात काम करावे लागणार आहे.नवीन रस्ते करणार नाही. २३ कोटीचा खर्च कोणत्या निकषानूसार ठेवलेले आहे खुलासा करावा. |
| श्री.वसंत नरवडे | :यात २१ रस्ते घेतलेले आहे. शहरातील इतर रस्त्यावर खर्चाच्या बाबतीत प्रशासनाने काय योजना आखलेली आहे.२३ कोटी जी अंदाजित रक्कम दिलेली आहे ती बरोबर आहे का तसेच या कामासाठी तांत्रिक सल्लागार काम पाहणार असेल तर महानगरपालिकेचे अधिकारी काय काम करणार आहे. एजन्सी मार्फत काम करीत असाल तर योग्य नाही. कामे निकृष्ट होत असेल तर अभियंताची पदे रिकामे करावे. |
| श्री.संजय जोशी | :एजन्सी मार्फत काम करून घेणार आहेत दुसरे असे की अंदाजे खर्च ठेवलेला आहे का याचाही खुलासा करण्यात यावा.यातील बरेचशे रस्ते चांगले आहेत. या रस्त्यावर ब्लॅक टॉपीग किंवा बाजूला गटारी वगैरे करणार आहोत काय ?जो परतावा दयावा लागणार आहे तो किती टक्के व्याजाने दयावा लागणार आहे.तीन वर्षा या रस्त्यावर देखभाल दुरूस्ती होणार आहे. तर किती टक्केने व्याज आकारणी करण्यात येणार आहे एकूण व्याज किती दयावे लागणार आहे यात दिलेले नाही. विना व्याजाने एखादी एजन्सी काम करून देणार असेल तर तशी कार्यवाही करावी. |
| श्री.मुजीब खान | :२३ कोटीमध्ये २१ रस्त्याचा समावेश केलेला आहे. यात काही रस्त्याचा समावेश नाही. जिल्हाधिकारी कार्यालय ते आकाशवाणी पर्यत १०० फुटाचा रस्ता होण्यासाठी अनेक दिवसापासून कार्यवाही होण्याबाबत प्रयत्न करीत आहोत. तसेच बुढ्ढीलेन ते आझाद चौक पर्यतचा रस्त्याचा समावेश करण्यात यावा. |

श्री.कोकाटे काशिनाथ :या विषयावर स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आलेली असून सन २००५-०६ च्या बजेटमध्ये जे डिफर पेमेन्टवर रस्ते करण्या संदर्भात ठळक वैशिष्टये मध्ये दिलेले होते. डांबरीकरण न करता काँक्रेटीकरण करावे अशीही चर्चा सभागृहात झालेली होती. परंतू सर्व जनतेला न्याय मिळणेच्या दृष्टीने कॉन्क्रेट रस्ते ३० टक्केच करता आले असते. १५ कि.मी. ऐवजी डांबरीकरणाचे जवळपास ४५ ते ५० कि.मीटर रस्ते होवू शकतील. काही रस्त्यावर डांबरीकरण निवडणूकीच्या वेळेस केलेले आहे. ते चांगल्या स्थितीत आहे. सर्व विचार करून या रस्त्याचे डांबरीकरण करावे म्हणून स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. व एमएसआरडीसी प्रमाणे जे काही नॉर्मस् आहे त्याप्रमाणे अमलबजावणी करावी.त्या प्रमाणेच अंदाजपत्रक तयार करावे अशी मान्यता देण्यात आलेली आहे.२० ते २५ कोटीचे रस्ते एकदम केले व अंदाजपत्रक बघीतले तर दर वर्षी डी.एसआर मधे १० ते १२ टक्केनी नैसर्गीक वाढ होते. जी मान्यता देणार आहोत त्यात सहा टक्केपेक्षा जास्त वाढ येवू शकणार नाही. हे महापालिकेच्या फायदयाचे असून तीन वर्षापर्यत सूविधा मिळणार आहे. हे शहर जागतिक पर्यटन स्थळ आहे च पर्यटक या रस्त्याचा वापर करू शकतील असेच रस्ते घेतलेले आहे यात लहान रस्ते घेतलेले नसून ते दरवर्षीच्या बजेटमधून करणे शक्य होईल .यात काही रस्ते राहिले असतील तर ते समावेश करावे. परंतू काही रस्त्याचे संदर्भात जागा भूसंपादीत करणे आवश्यक आहे ते रस्ते यात आलेले नसतील.टीडीआर मान्यतेसाठी शासनाकडे पाठविलेले आहे ते शासनाकडून मंजूर होवून आले तर या रस्त्याचे ही काम करता येईल. एकदा धोरण ठरविल्यनंतर किती कि. मीटर रस्ते करायचे हे ठरविता येईल. धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. योग्य ती चर्चा करून मान्यता देणे आवश्यक आहे.

श्री.मुजीब खान :यात रविद्रनगर ते कटकट गेट पोलीस कॉलनी रस्त्यासाठी भूसंपादन करण्याची कोणती अडचण नाही तो रस्ता घेणे आवशक आहे. स्थायी समितीमधे या संदर्भात चर्चा झालेली होती व समावेश करावा म्हणून निर्णय झालेला होता परंतू प्रस्तावात आलेले नाही. रोषणगेट ते चंपामस्जीद आझाद चौक पर्यत रस्ता येणे आवशक होते यात त्या रस्त्याचा समावेश केलेला नाही.जिल्हाधिकारी कार्यालय ते आकाशवाणी पर्यत रस्ता येणे आवशक होते.अशा मोठया रस्त्याची कामे केल्यानंतर इतर वार्डातील लहान रस्त्यासाठी खर्च कोठून करणार आहे याचाही खूलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : डिफर पेमेन्ट प्रमाणे असले तरी हे कर्ज प्रमाणे राहिल.पूढील वर्षी ३० ते ४० टक्के पेमेन्ट करावे लागेल. सिमेंटचे रस्ते केले असते तर ७० ते ८० कोटी खर्च अपेक्षीत होतो. कोणतेही रस्ते करा व किती करावे परंतू दरवर्षी १० कोटी पेक्षा जास्त खर्च होणार नाही यादृष्टीने निर्णय घ्यावा. शेवटी २० टक्के रस्ते केले तर शेवटच्या वर्षी ८ कोटीचा खर्च पडेल. हे रस्ते यासाठी करणे गरजेचे आहे की प्रत्येक वर्षी डीएसआर हे १० टक्केनी वाढते यामधे सहा टक्केची वाढ देणार आहे. २५कोटीपेक्षा जास्त खर्च होईल इतके रस्ते घेवू नये त्यामूळे पूढील वर्षी बजेटमधे तरतूद करण्यास अडचण येईल. जे काही करणार आहे त्यामधे ५० टक्के कामे त्यात काही अडचण नाही जागा उपलब्ध आहे सर्वे करण्याची गरज नाही. स्लोप चांगला आहे. ते महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याकडून करून घेता येईल. जेथे अडचण आहे तेथे पीएमसी नियुक्त केली जाईल. पीएमसीला जे काही एमएसआरडीसी टक्केवारी देतात त्यापेक्षा ०.५ किंवा १ टक्के कमी देत आहोत.

हे रस्ते करणार आहोत,पूर्ण रूंदीसाठी रस्ते करण्यात येईल. नागपूरमध्ये असे प्रकारचे रस्त्याची कामे केलेली आहे. यासाठी खर्च जास्त लागतो याचा दुसरा फायदा असा की तीन वर्षापर्यत देखभाल दुरूस्तीची कामे त्यांना करावी लागतात. ३० ते ४० टक्के रक्कम महापालिकेकडे असेच चांगल्या प्रतिचे काम केले नाही तर नियमाप्रमाणे कार्यवाही करता येईल.या प्रमाणे रस्ते केले नाही तर महापालिकेला सुध्दा १० कोटीचे रस्त्याची कामे दर वर्षी करावीच लागतील. सर्वसाधारण सभेने प्रस्ताव मंजूर केलेला होता त्याप्रमाणे ठेवलेला आहे. पी.एम.सी.ला एम.एस.आर.डी.सी. चे दर प्रस्तावित आहे.

श्री.बारवाल गजानन : यात श्रीखंडे एजन्सीचा उल्लेख केलेला आहे त्यांना अनुभव आहे असेही दिलेले आहे. त्या संदर्भात सभागृहाला माहिती दयावी.

अति.शहर अभियंता : अर्थसंकल्पात सन ०५-०६ मधे ठळक वैशिष्टेमध्ये डिफर पेमेन्टवर रस्ते तयार करण्याचे दिलेले होते .प्रशासनानेकार्यवाही करून प्रस्ताव ठेवलेला आहे. ही कार्यवाही करीत असतांना एमएसआरडीसी यांचेकडे जे नोंदणीकृत पीएमसी आहे ते एकूण १२ ते १३ असून त्या सर्व एजन्सीला बोलवून मा.आयुक्ताच्या दालनात बैठक घेण्यात आलेली होती. यापैकी ५ एजन्सी धारक हजर होते. व या पाच पीएमसी ला त्याची टेक्नीकल माहिती देण्या संदर्भात सांगण्यात आले होते. त्यापैकी श्रीखंडे एजन्सीने माहिती दिली व या पीएमसीने मुंबई ठाणे पूणे या ठिकाणी काम केलेले आहे व तसे प्रमाणपत्र त्याचेकडे आहे. डिफर पेमेन्टवर काम करण्याचा चांगला अनूभव आहे.

श्री.गजानन बारवाल : पीएमसींना जाहीरात देवून बोलविले की पत्र देवून बोलविले होते.

अति.शहर अभियंता : या सर्वांना पत्र देवून बोलविण्यात आले होते.

मा.आयुक्त : एमएसआरडीसी कडे ज्या पीएमसीने काम केलेले आहे त्यांनाच बोलविण्यात आलेले होते.

मा.महापौर : प्रस्ताव स्थायी समितीमार्फत आलेला आहे. सदर पीएमसीला स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : स्थायी समितीने त्यांचे अधिकारात मंजूर केलेले आहे. या सभागृहात आपणा सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे. जाहीरात देवून पीएमसी ला बोलविण्यात यावे. विना टेडर बोलवू नये. पत्र देवून बोलविता येते का कायदयात काय आहे खूलासा करावा. पी.एम.सी.ला किती द्यावे लागेल.

श्री.वसंत नरवडे : श्रीखंडे यांचे नांव प्रस्तावात का आले.

श्री.गजानन बारवाल : यामध्ये काही रस्त्यांची नांवे समाविष्ट करण्यात यावी. त्यामध्ये गजानन महाराज मंदिर ते जय भवानी नगर,सिटी चौक, नवाबपुरा,संस्थान गणपती,किराणा चावडी रस्ता ते कॉसमॉस बँक,जालना रोडपर्यंत वोखार्ड,ग्रीव्हज्, नारेगांव इत्यादी.

श्री.वसंत नरवडे : हीच रस्त्याची नांवे अंतिम करू नये. यामध्ये अजून काही स.सदस्यांचे प्रस्ताव असतील तर त्यात वाढ करण्यांत यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : रस्त्यासाठी आपण जे २३ कोटी ठेवण्यात आलेले आहे, ते २३ कोटी न ठेवता १० ते १५ कोटी ठेवण्यात यावे. तत्वत: मान्यता देण्यांत यावी.

डॉ.भागवत कराड : श्रीखंडेला आपण पी.एम.सी.म्हणून नेमले असेल तर,किती चार्जेस देणार आहे. त्यांना प्रतीमहा देणार का, किंवा डिफर पेमेंटच्या रक्कमेवर देण्यात येणार आहे. त्याची टक्केवारी काय. त्यात टक्केवारीवर देण्यांत येणार असेल तर कॉम्प्युटेटिव्ह रेट का घेतले नाही.

अति.शहर अभियंता : आपण १.५% हा रेट आपण कम्प्याटेटिव्ह म्हणजे एम.एस.आर.डी.सी. त्यांना २.५% देते. त्यात सुपरव्हिजन व अंदाजपत्रक तयार करणे इत्यादी आहे. आपण १.५% निश्चित केलेले आहे. यापेक्षा जास्त देणारच नाही. त्यांनी रस्त्याचे सर्वेक्षण करून त्याचे ड्राईंग,इस्टीमेट द्यायचे आणी क्रॉस व लॉन्झीट्यूडनल सेक्शन काढणे, आय.आर.सी. व आय.एस.कोड प्रमाणे डिझाईन करणे,घनता काढणे,स्पेसिफिकेशन देणे इत्यादीसाठी १% व नंतर बील तपासणे तांत्रिक सल्लागार म्हणून काम पाहणे या सर्व कामांसाठी सर्व मिळून जास्तीत जास्त दिड टक्का. जेव्हा आपण एजन्सी फिक्स करू, त्यावेळेस त्यांनी क्वॉलिटी कंट्रोल आय.आर.सी.प्रमाणे तपासणी करावयाचे आहे. व जसे जसे त्यांचे कामाचे अहवाल येतील, त्याप्रमाणे त्यांचे पेमेंट करायचे.

श्री.संजय जोशी : आपण बी.ओ.टी.वरही पी.एम.सी.नेमलेले आहे व यावरही पी.एम.सी.नेमलेले आहे. इतर महापालिकेमध्ये जसे प्लॅनिंग डिपार्टमेंट आहे, तसे आपण नेमू, पैसा बाहेर जाणार नाही.

श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग : विकास योजनेच्या पुर्ण रस्त्यांचा समावेश केलेला आहे का? पडेगांव, मिटमिटा भागातील रोड आलेले नाही त्यांचा समावेश करण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : प्रभागातील रस्त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद आहे का?

अति.शहर अभियंता : अर्थसंकल्पामध्ये नावानिशी प्रस्ताव ठेवण्यात आलेले आहे.

श्री.संजय जोशी : आपण पी.एम.सी.कडून ड्राईंग,डिजाईन इस्टीमेट इत्यादी करून घ्यायचे पुढे चालून स्टेशन रोडची परिस्थिती कशी झाली आहे हे सर्वांना दिसते त्याप्रमाणे झाले तर याची जबाबदारी कोणावर आहे, त्यांचा करारनामा कसा करणार आहेत.

मा.आयुक्त : पी.एम.सी.वर जबाबदारी आहे.

श्री.वसंत नरवडे : ज्या-ज्या वार्डात डांबरीकरणाची कामे घेतलेली आहे त्यासाठी निधी उपलब्ध करून देणार का?

मा. आयुक्त : आपणांस डिफर पेमेंटवर रस्त्यासाठी खर्च केल्यानंतरही बाकीचे लहान लहान कामासाठी निधी उपलब्ध पाहीजे. म्हणूनच माझे मत असे आहे की, इतकेच रस्ते घेण्यात यावे की, त्यांचा हप्ता दहा कोटी पेक्षा जास्त होवु नये. म्हणून आम्ही २३ कोटी प्रस्तावित केले होते, त्याचे ४० टक्के, १० कोटीच्या आत येते. म्हणजे उर्वरीत कामासाठी निधी शिल्लक राहील. आम्ही तेच रस्ते घेतले जे सर्वसाधारण सभेने मंजुर केले होते. फक्त सिमेंटचे डाबंरीकरण केले.

मा.महापौर : विषय क्र.१ दुरूस्तीसह मंजुर, सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सभासदांनी ज्या सूचना केलेल्या आहे, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता,ज्येष्ट सदस्य श्री.ओबेरॉय इत्यांदीनी ज्या रस्त्यांच्या नांवाची सूचना केलेल्या आहे,हे जर करणे शक्य असेल तर (फिजीबल) ते करावे. प्रथम प्रस्तावित कामे करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावित अ.क्र.१ ते २१ कामांचे आणि खालील नऊ रस्त्यांचा त्यात समावेश करण्यात यावा. सदर कामांचे अंदाजपत्रके तयार करून सदर कामे करण्यासाठी अंदाजित रक्कमेसह निविदा प्रक्रिया करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदर कामांकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमण्याकरीता खालील दराने नियुक्ती करण्यास सर्वानुमते मजुरी देण्यात येते.

(अ) रस्त्यांचे सर्वेक्षण करणे, रस्त्यांचे Cross व Longitudinal Section काढणे, संबंधीत IRC व IS किंवा तत्सम कोडप्रमाणे रस्त्याचे डिझाईन करणे, रहदारी घनता काढणे, कामांचे स्पेसिफिकेशन देणे. कामांचे अंदाजपत्रक तयार करणे या सर्व कामांसाठी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १%(एक टक्का).

(ब) उपरोक्त कार्यवाहीनंतर व निविदा काढल्यानंतर व कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक व प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर,ख काम चालू असतांना, मानकाप्रमाणे काम करून घेण्यासाठी आवश्यक त्या चाचण्या घेणे, तसेच वेळोवेळी कामाची पाहणी करून कामाचा दर्जा व गुणवत्ता राखुन काम करून घेणे. Working drawing तयार करणे व सदर drawing काम करीत असतांना पुरविणे. कॉन्ट्रॅक्टरने सादर केलेले बील तपासून सादर करणे, निविदेतील अटी व शर्तीनुसार काम करून घेणे, नियमितपणे कॉन्ट्रॅक्टरने केलेल्या कामाचा प्रगती अहवाल देणे, काम चालू असतांना काही अडचणी आल्यास समन्वयक म्हणून काम करणे, कामाचा दर्जा तपासून प्रमाणित करणे, तसेच महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार म्हणून काम पाहणे. इत्यादी सर्व कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेवर १.५०% (दीड टक्का).

| अ.क्र. | रस्त्याचे नांव |
|---|---|
| १ | लक्ष्मण चावडी टेलीफोन एक्स्चेंज ते सेवा नियोजन कार्यालय रस्ता |
| २ | सतीश मोटर्स, अदालत रोड ते महात्मा फुले पुतळ्यापर्यंत रस्ता |
| ३ | बुद्धीलेन ते आझाद चौक रस्ता |
| ४ | रविंद्रनगर ते कटकटगेट मार्गे सिडको पोलीस क्वॉर्टर पर्यंत रस्ता |
| ५ | गजानन महाराज मंदीर ते जयभवानीनगर रस्ता |
| ६ | किराणा चावडी ते कॉसमॉस बँक, जालना रोडपर्यंत रस्ता |
| ७ | सिटीचौक-नवाबपूरा-संस्थान गणपती-किराणा चावडी रस्ता |
| ८ | पडेगांव व मिटमिटा भागातील ८० फुटाच्या वरील डी.पी.रस्ते |
| ९ | रेल्वेस्टेशन उड्डाणपुल ते दैनिक तरूण भारत ८० फुट रूंद रस्ता |
| १० | गरवारे क्रिडा संकुल ते कॉस्मो कंपनी ते महाराष्ट्र डिस्टीलरी पर्यंत रस्ता |
| ११ | वोखार्ड कंपनी टी पॉईट ते नारेगांव रस्ता |
| १२ | ग्रीव्हज् लोम्बार्दीनी ते नारेगांव चौक पर्यंत रस्ता. |

वरीलपैकी डिफर्ड पेमेंटवर प्रतीवर्षी रू.१० कोटीपेक्षा जास्त हप्ता होणार नाही इतकीच कामे करण्यात यावी. सदर प्रस्तावास स्विकृतीसह प्रशासकीय मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४३/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका औरंगाबाद मार्फत स्वामी विवेकानंद उद्यान येथे बांधण्यात आलेली महानगरपालिकेची कारगील स्मारक ही वास्तु IESL [Indian Ex. Servicemen League] यांना वापरण्याकरीता व काळजी वाहक म्हणून काही अटी व शर्तीस अधिन राहून हस्तांतर करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

इ.स.१९९९ मधील कारगिल युध्दात शहीद झालेल्या ५२४ सैनिकांचे स्मरणार्थ मनपातर्फे स्वामी विवेकानंद उद्यान येथे रू.१७,६७,२२७/- खर्च करून कारगिल स्मारक हि वास्तू उभारण्यात आलेली आहे. सदरील वास्तुबाबत तत्कालीन महापौर व स्थानिक सैनिकी संस्था IESL [Indian Ex. Servicemen League] यांचे प्रतिनिधी सेवा निवृत्त कर्नल श्री.पील.एन.मोडक, सेवा निवृत्त कर्नल श्री.रमेश वाघमारे यांच्या सोबत झालेल्या चर्चेनुसार सदरील वास्तु पुढील प्रमाणे वापरात आणण्याचे निश्चित केले आहे.

अ) कारगिल स्मारक म्हणून

ब) माजी सैनिकांचे कल्याण केंद्र

क) सैनिकी सेवा करीता तरूणासाठी मार्गदर्शन केंद्र

ड) सैनिकी सेवा अभ्यास केंद्र

इ) Ex. Services league office/ स्मारकाचे काळजी वाहक

सदरील प्रस्तावा अंतर्गत सुरूवातीस IESL तर्फे से.नि.कर्नल श्री.पी.एन.मोडक, से.नि.कर्नल श्री.रमेश वाघमारे यांनी रक्कम रूपये ३३०००/- प्रति माह या प्रमाणे Recurring charges अपेक्षित असल्याचे IESL यांच्या प्रस्तावात नमुद करण्यात आले आहे. सदरील खर्च मनपातर्फे करण्यात यावा अशी संबंधीतांची विनंती होती या बाबत सदरील प्रस्तावावर संबंधीता सोबत दिनांक १९.१२.२००५ रोजी चर्चा झाली त्या अनुषंगाने सदरील Recurring charges बाबत पुढील प्रमाणे धोरण प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| **अ** | सैनिक महामंडळाचे दोन सिक्युरिटी गार्ड | प्रत्यक्ष वेतनानुसार |
| **ब**<br>(१) | स्मारकाच्या सफाई व तत्सम कामासाठी एका शिपायाची नेमणूक | रू.३३००/- प्रति माह (किमान वेतनानुसार) |
| २) | स्मारक परिसरातील उद्यान देखरेखीसाठी एक माळी याची नियुक्ती प्रतिदिवस ३ तास या प्रमाणे | रू.१०००/- प्रतिमाह (किमान वेतन कायद्याच्या अधिन) |
| ३) | स्मारकासाठी वापरण्यात येणाऱ्या विद्युत देयकाचा खर्च | प्रत्यक्ष बिलानुसार किंवा जास्तीत जास्त रू.१०००/- प्रति माह |
| ४) | स्मारकातील दूरध्वनी देयकाचा खर्च | रू.५०० प्रतिमाह |
| ५) | दैनिके/साप्ताहीके/मासिके यांचा खर्च | रू.१०००/- प्रति माह |
| ६) | सफाईसाठी लागणाऱ्या सामुग्रीचा खर्च | रू.५००/- प्रति माह |
| | **एकूण**<br>**समजा रू.** | **७३००/-**<br>**७५००/- प्रतिमाह** |

उपरोक्त ''अ'' नुसार येणारा सैनिक मंडळाच्या दोन सिक्युरिटी गार्डचा प्रत्यक्ष वेतन खर्च अधिक 'ब' नुसार प्रतिमाह रू.७५००/- याप्रमाणे खर्च करण्यास मान्यता मिळावी. या व्यतिरिक्त सुरूवातीस टेलीफोन उपकरण बसविण्यासाठी जास्तीत जास्त खर्च रू.२०००/- (दोन हजार फक्त) यास मान्यता मिळावी.

१) उपरोक्त बाबीच्या खर्चास मान्यता देत असतांना सदरील ठिकाणी उत्पन्नाच्या दृष्टीने या ठिकाणी येणाऱ्या १२ वर्षावरील पर्यटकास किमान रू.२/- इतकी प्रवेश फि आकरण्यात येणार आहे.

२) सदरील बाबीचा हिशोब ठेवण्याकरीता मनपातर्फे एका संपर्क अधिकाऱ्याची नियूक्ती करण्यात येणार असून जे सदरील ठिकाणी होणाऱ्या जमा खर्चाबाबत हिशोब ठेवतील व तपशिलवार वार्षीक अहवाल IESL मार्फत आयुक्त यांना आर्थिक वर्षाच्या शेवटी सादर करतील.

३) सदरील जमा खर्चासाठी राष्ट्रीयकृत बॅंकेत एक स्वतंत्र खाते IESL च्या नावाने ठेवण्यात येणार आहे.

४) सदरील स्मारकाचे काम पुर्णपणे IESL मार्फत पूर्ण करून घेवून Hon. Chief of Army staff Aurangabad यांच्या हस्ते २६ जुलै २००६ (कारगिल दिवस) रोजी उदघाटन करण्याचे प्रस्तावित आहे.

५) सदरील स्मारकाचा विकास करीत असतांना इमारतीच्या दक्षिणेकडील खूल्या जागेत काही भागात एक लॉन विकसीत करून त्यामध्ये Army items Display करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच IESL ला उत्पन्नाच्या दृष्टीकोनातून सैनिकी बोधचिन्हे, सैनिकी सेवा बाबत च्या साहित्याची विक्री इत्यादी करीता स्मारकाच्या परिसरात काही स्टॉल्स उपलब्ध करून देण्याबाबत विचार करण्यात येत आहे.

या व्यतिरिक्त IESL यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे सदरील स्मारक वापरात आणण्यापूर्वी सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार येणाऱ्या सुरवातीच्या एकत्रित खर्चाची तरतूद करणे आवश्यक आहे. सदरील तक्त्यानुसार एकूण खर्च रक्कम रू.५,०५,२००/- इतका येणार आहे त्यास देखील मान्यता मिळावी.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका औरंगाबाद मार्फत स्वामी विवेकानंद उद्यान येथे बांधण्यात आलेली महानगरपालिकेची कारगील स्मारक ही वास्तु IESL [Indian Ex. Servicemen League] यांना वापरण्याकरीता व काळजी वाहक म्हणून प्रस्तावातील अटी व शर्तीस अधिन राहून हस्तांतर करण्यास मान्यता देण्यांत येते व प्रस्तावित ''अ'' नुसार येणारा सैनिक मंडळाच्या दोन सिक्युरिटी गार्डचा प्रत्यक्ष वेतन खर्च अधिक 'ब' नुसार प्रतिमाह रू.७५००/- याप्रमाणे खर्च करण्यासही मान्यता देण्यांत येते. तसेच सुरूवातीस टेलीफोन उपकरण बसविण्यासाठी रू.२०००/- (दोन हजार फक्त) च्या खर्चास मान्यता देण्यांत येते. त्याचप्रमाणे सदरील स्मारक वापरात आणण्यापूर्वी अ.क्र.१ ते ५ च्या अटीस अधीन राहून सुरवातीच्या एकत्रित खर्चासाठी रक्कम रू.५,०५,२००/- तरतूद करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४४/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील सर्व नाले साफ करण्यासाठी आर्थिक वर्ष २००५-०६ अंतर्गत महानगरपालिकेतर्फे 'नाला सफाई आणि गाजर गवत निर्मूलन' या लेखाशिर्षकाखाली रूपये ६०.०० लक्षाची तरतूद करण्यात आली आहे.

रूपये ६०.०० लक्ष ही तरतूद शहरातील संपूर्ण नाले साफ करण्यासाठी अत्यंत तोकडी आहे. त्यामूळे सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील संपूर्ण नाला सफाई या रक्कमेतून करणे शक्य नसल्याने फक्त ज्या ठिकाणी नाला तुबूंन राहतो, तेथील सफाई करून पाणी मोकळे वाहील अशाप्रकारे गरजे पुरतीच सफाई करण्यात येईल व त्यासाठी रूपये ६०.०० लक्ष या तरतूदी मधून गरजेनुसार रक्कम वापरून हे काम करण्यात येईल.

औरंगाबाद महापालिकेतर्फे नुकतेच नाल्यातील अडथळे आणणाऱ्या अनाधिकृत बांधकामाचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यात एकूण १५१३ छोटी मोठी अतिक्रमणे, अनाधिकृत बांधकामे आढळून आली. या सर्व मालमत्ता धारकांना त्यांचे अनाधिकृत बांधकाम जे नाला प्रवाहाला अडथळा निर्माण करीत आहे, ते काढून घेण्यासाठी महानगरपालिकेतर्फे नोटीस पाठवून अवगत करण्यात आले आहे. मात्र दिलेल्या एक महिन्याची मुदत संपून देखील संबंधीत अनाधिकृत बांधकामे केलेल्या/नाला प्रवाहास अडथळा निर्माण केलेल्या मालमत्ता धारकांनी अद्याप नोटीसला प्रतिसाद दिलेला नाही. त्यामूळे ही सर्व अतिक्रमणे आणि नाला प्रवाहास अडथळा निर्माण करणारी अनधिकृत बांधकामे तोडून जर संबंधीत जागा संबंधितांची मालकीची असेल तर अशा या नागरीकांचे पुनर्वसन महानगरपालिकेच्या मालकीच्या हर्सूल,नक्षत्रवाडी इत्यादी ठिकाणी असलेल्या जागेवर करण्याचा मानस आहे. हे करतांना त्यांची मालकीची नाल्याला अडथळा करणारी जागा मनपाच्या ताब्यात घेवून मनपाच्या तितकीच किमंतीची जागा त्यांना प्रदान करणे प्रस्तावित आहे. त्यासाठी या मोकळ्या जागी नगर रचना विभागातर्फे खाजगी एजन्सी मार्फत रेखाकंन करून, त्यात छोटे प्लॉट्स पाडून ते या नागरीकांना वाटप करण्याचा मानस आहे. जेणे करून नाला प्रवाहास अडथळे निर्माण करणारे अनाधिकृत बांधकाम पाडून नाला प्रवाह सुरळीत करता येईल व संबंधीत मालमत्ता धारकांचे पुनर्वसनही होईल.

तरी या कामी लागणारा निधी सुमारे ४० लक्ष रूपये या पुनर्वसनाच्या कामी वळती करून उर्वरित निधी नाला सफाईसाठी वापरण्याचे नियोजन केले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावास आणि एकूण रूपये ६०.०० लक्ष या तरतूदीमधून रूपये ४०.०० लक्षची तरतूद वळती करण्याच्या कार्यवाहीस कृपया मान्यता व्हावी ही विनंती.

प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : या प्रस्तावाचा संपूर्ण खूलासा करण्यात यावा.

श्री. सिताराम सुरे : आपण ६० लाख रूपये नाला सफाईसाठी ठेवलेले होते, त्यापैकी ४० लाख आपण नाल्या काठच्या लोकांचे पुनर्वसनासाठी देणार आहोत, अनाधिकृत

बांधकाम वाल्यांना जर पैसा दिला तर सर्वच पैसे मागतील. आपण श्रीमान श्रीमती व गोमटेश मार्केट येथे औषधी भवनला नाल्यावर परवानगी दिली, त्याठिकाणी नाल्याचे पाणी तुबंले व लोकांच्या घरात शिरले तर त्या इमारती पाडणार आहात का? आणि त्यांना खर्च देणार आहात का? माझा बोलण्याचा उद्देश असा आहे की, हा विषय नामंजूर करण्यांत यावा.

श्री. वसंत नरवडे : नाला सफाईसाठी गेल्या वर्षीच्या ६०.०० लाख तरतूदीपैकी फक्त १८.०० लाखामधून आमचे कार्यकारी अभियंता यांनी पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीकोनातून काम केलेले आहे. हे आपल्या प्रत्येक वेळेस शक्य होईल असे वाटत नाही. निसर्गाची माहिती घेवून आला आहात का. भविष्यात पाऊस कमी पडेल व पाण्याचा निचरा होईल, आणि ४० लाख रूपये आपण याच्यावर खर्च करू याबद्दल जो युक्तीवाद लावला,नाला सफाई पूर्ण गाळासह खालून निघत नाही. तोपर्यंत शहरातील तुंबलेल्या पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. अशी दिशाभूल या अधिकाऱ्यांनी आणि प्रशासनाने करून घेवू नये व लोकांचे जीव धोक्यात आणू नये. ज्यांनी अतिक्रमणे केले ते काढून टाकावे. कोणीही मध्यस्थी करणार नाही. नाले उघड्यावर आहेत इतर वसाहतींना त्रास होतो. तरतुदीमध्ये बदल करून तरतुद कमी करू नये. एखाद्या दिवशी मुंबई सारखी परिस्थिती औरंगाबादमध्ये उदभवेल. गुलमंडी,औरंगपुरा,रोशनगेटच्या बाहेरील भागातील हे प्रश्न आहेत.

श्री.तरवेंद्रसिंग धिल्लन : प्रस्ताव मंजुर करण्यात यावा, परंतु पावसाळ्या पूर्वी हे काम व्हावे.

डॉ.भागवत कराड : पाऊस झाल्यानंतर नाल्यालगत जी अनधिकृत घरे आहे किंवा परवानगीने घर बांधले असेल तर त्यासंबंधी कार्यवाही करणे आवश्यक आहे. अधिकृत असेल तर मोबदला देण्यात यावा. अनधिकृत असेल तर देण्यात येवू नये. रेखांकन व बांधकाम परवानगी घेतलेली असेल तर महानगरपालिकेने मोबदला द्यावा.

श्री.गजानन बारवाल : जे-जे नाल्यावर बांधण्यात आलेले आहे ते सर्व अनधिकृत आहे. अधिकृत असले तर ठिक आहे. याशिवाय आणखीन पण असेल. नक्षत्रवाडी आणि हर्सूल एवढेच वॉर्ड आपण निवडलेला आहे, शहरात आणखीणही असतील. तर त्याचा सुध्दा विचार करण्यात यावा.

मा.आयुक्त : जेंव्हा मागच्यावेळी पाऊस झाला त्यावेळेस सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. आपल्या जवढे नाले आहे, त्यापैकी फक्त १० प्रकरणात बांधकाम परवानगीचे अधिकृत घरे आहेत. उर्वरीत सर्व १५१३ आढळून आले ते सर्वच्या सर्व अनाधिकृत आहे. आपल्याला सर्व नाल्यांचा प्रवाह सुरळीत करावयाचा आहे. जे अनाधिकृत बिल्डींग आहे ते दोन प्रकारचे आहे. कोणते अनधिकृत आहे त्यात प्रामुख्याने ते खाजगी मालकीची आहे किंवा अतिक्रमण झालेले आहे खाजगी मालकीची असतील तर, त्यांच्याकडून पुरावा घ्यावा लागेल. त्यांनी विकत घेतलेले असतील, अतिक्रमण धारकांना काहीही देणार नाही. या ४०.०० लाखामधून आपण एक रेखाकंनाचा विकास करणार व विस्थापितांचे पुनर्वसन करणार. व त्या ठिकाणी ज्यांना स्थलांतरीत करणार त्यांचेकडून खर्च वसूल करणार. विना खर्च वसूल करता कोणालाही जमीन देण्यांत येणार नाही. ज्यांनी मालकी पुरावे दिले त्यांनी अनधिकृतरित्या विकास केला त्यांचेकडून विकास खर्चाची रक्कम टप्प्याटप्प्याने वसुल करावी लागेल.

सौ.लता दलाल : नाल्यात ज्यांनी घरे बांधली,त्यांची मालकी आपण गृहीत धरणार का. नाल्याच्या वर थोडे आणि नाल्यामध्ये थोडा भाग येतो, त्यास आपण मालकी गृहीत धरणार का. नाल्यात घरे आहेत,त्यांना भरपाई देणार आहात का.

मा.आयुक्त : ही नुकसान भरपाई नाही. कुणासही रोख स्वरूपात पैसे दिले जाणार नाही. मालकी संदर्भात त्यांचेकडे पुरावे असतील, प्रॉपर्टी कार्ड, सात बारावर नांव असेल, ज्यांचे आपण पुनर्वसन करणार आहोत, त्यांचेसाठी आपण ले-आऊट डेव्हलप करून त्यावर आलेला खर्च देण्यात येणाऱ्या जागेच्या प्रमाणात त्यांचेकडून वसूल करण्यात येणार आहे. व कोणत्याही प्रकारची पैशाच्या स्वरूपात सवलत दिली जाणार नाही. जर कुणी १०० टक्के अतिक्रमण करून नाल्यात घरे बांधले असेल तर महानगरपालिका पैसे देणार नाही. हे ४० लाख रूपये पुनर्वसनासाठी रेखाकंनअंतर्गत जो विकास करावा लागणार आहे, त्यासाठी लागणार आहे. विकासासाठी येणारा खर्च व जमीनीची किमंत मिळून टप्प्याटप्प्याने त्यांचेकडून वसूल करण्यात येणार आहे.

श्री. संजय जोशी : नाल्याच्या प्रवाहाला जर अडचण येत असेल तर ते घर काढावे. नाल्यात घर असेल तर ते अतिक्रमण आहे. अनाधिकृत म्हणजे परवानगी देय आहे परंतु परवानगी घेतलेली नसेल अशी घरे देखील असण्याची शक्यता आहे. तशी असेल तर ठिक आहे. परंतु आपण नाल्यावर परवानगीच देवू शकत नाही.

मा.आयुक्त : १० सोडले तर सर्व अनधिकृत आहे.

श्री. संजय जोशी : नाल्याची जी जागा असते ती पोट खराबमध्ये धरण्यात येते व पोटखराबची जागा विकली जात नाही. शासनाचे नियम आहे की,नाल्याची हद्द सोडून ठराविक अंतरावर घर बांधावे. यांनी नियम तोडून घरे बांधल्यानंतर आपण दायित्व (लायबिलिटी) का स्विकारावे.

मा.आयुक्त : आपण कोणाचेही दायित्व घेत नाही. नाल्यावरील १५१३ घरांपैकी दहांना बांधकाम परवानगी आहे. उर्वरीत सर्व अधिकृत नाही.

सौ. लता दलाल : ह्या शहरात अशी परिस्थिती आहे की, आपल्या मिळकतीवर महापालिकेचे नांव आहे किंवा नाही ही शंका निर्माण होते. अशी परिस्थिती आहे. घरांची मालकी कागदपत्रे करून घेतली असेल. मुळ हद्दी अभिलेखावर अधिकृत असतील आणि त्या हद्दीतच घर असेल तर पुर्नवसनाची गरज नाही.

मा.आयुक्त : कोणासही नुकसान भरपाई देणार नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आपण मंजुर करावे पुर्नवसन करणे आपले काम आहे. जागांच्या मोबदल्यात अनेक वेळा आपण जागा दिलेली आहे. पुर्नवसन करतांना जेवढी त्यांची जागा आहे तेवढीच देणेस हरकत नाही, सहानुभूतीपुर्वक विचार करावा.

सौ.लता दलाल : ४० लाख खर्च करणेसाठी आमचा विरोध आहे.

श्री.मुजीब आलमशहा : सर्वे नं. मध्ये नाले समाविष्ट आहे. मालकी हक्कामध्ये त्यांना विकण्यात येते. प्रशासनाने सर्वे करून विचारपूर्वक आणलेला आहे. उदा.साठी सिटी सर्वे नं. ११३५३ मकसुद कॉलनी येथे नाला दाखविलेला आहे. या सिटी सर्वे नं.चा काही भाग नाल्यात आलेला आहे. व ते त्यांनी विक्री केलेले आहे. कारण त्याचा तो मालकी हक्क होता. आपल्याकडून नाल्याच्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अद्यापही स्पष्टीकरण झालेले नाही. प्रशासनाने आता सुविधा देण्याचा विचार केलाय, काही ठिकाणी नाल्याच्या जागेला सर्वे नं. पडलेले आहे. दुसरे उदा.असे आहे की, शहाबाजारचा जो झोपडपट्टी भाग येतो, त्यांचे इतर ठिकाणी पुर्नवसन करणे आवश्यक आहे. ज्यांच्याकडे मालकी हक्क आहे, ज्यांना सर्वे नं.,सि.सर्वे नं. पडलेला आहे व त्यांचेकडे मालकी हक्काचे कागदपत्र आहे, अशांना द्यायला हरकत नाही, त्याशिवाय इतर कुणालाही देवू नये.

श्री.नाहदी नासेर : आताच स.सदस्यांनी जे सांगितले ते योग्य आहे. हा गरीबांचा प्रश्न आहे. प्रत्येक पावसाळ्यामध्ये हा प्रश्न पूढे येईल व त्यावेळेस जीवित व वित्त हानीचा प्रश्न उद्‌भवेल, हे कुठपर्यंत चालत राहील. या अगोदरचेही असे अनेक उदा.आहेत की, प्रशासनाने पर्यायी जागा दिलेली आहे. हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री.मिलींद दाभाडे : नाल्याच्या किनाऱ्याला जे घरे आहेत त्यामध्ये शहाबाजार,मकसूद कॉ.,हिलाल कॉ. या सर्व ठिकाणी राहणारे लोक बहूजन समाजातील मोलमजूरी करणारे आहे. त्याठिकाणी काही बंगले नाहीत. त्यांना आपण बेघर करतो, तर त्यांची पुनर्वसनाची जबाबदारी देखील आपण स्वीकारली पाहीजे. झोपडपट्टी भागात जी परवानगी दिलेली आहे, नैसर्गिक आपत्तीचा विचार करूनच परवानगी द्यायला पाहीजे होती. १० लोकांना परवानगी कशी दिली? परवानगी वाल्यांना जशी मदत करणार आहोत, तशी इतरांनाही मदत करणेत यावी. अशी सभागृहाला विनंती आहे.

श्री.तरविंदरसिंग धिल्लन : हे जे नाल्याचे प्रकरण आहे, ते सरकारी नसतात. नाले खाजगीपण आहेत. यातून जे सरकारी पाणी वाहते याचा अर्थ ते सरकारी होतात असे नाही. काही नाले खाजगी मालकीची असल्याची अनेक उदा.देता येतील. नाल्याचे जे पोटखराब आहे, तेही सात बारातील मालकी हक्कापैकी आहेत. जमीन महसूल आकारणीसाठी खराब आहे. पुनर्वसन करण्यात यावे, पर्यायी जागा देण्यात यावी.

सौ.लता दलाल : हा जो प्रस्ताव आहे, योग्य रितीने मांडलेला नाही. ६० लाख पैकी ४० लक्ष पुनर्वसनासाठी व २० लाख नाला सफाईसाठी, २० लाखात नाला सफाई होवूच शकत नाही. नाला सफाईला किती रक्कम लागेल, एकूण किती नाले आहे, किती रूंदी,किती लांबी,किती गाळ काढावा लागेल, किती खोल, किती फुटापर्यंत खर्च लागेल. यासबंधी तपशिलवार माहिती देण्यात यावी, तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

श्री.मिलींद दाभाडे : नाल्यातील बांधकामाचा प्रश्न एवढा उद्‌भवलेला आहे,औरंगपुऱ्यात जे शिवाई ट्रस्टचे जे बांधकाम चालू आहे, त्याच्या परवानगीचा पुर्वविचार करण्यात यावा.

मा.महापौर : सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. १४५/४ :**

आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, विद्यानगर या मंजुर रेखाकंनातील नगर भूमापन क्रमांक १५१८९ ते १५१९४ यांना त्यांचे भूखंडाचे पूर्व बाजूने सद्यस्थितीस रस्ता नसल्याचे आढळून आले आहे.

मूळ मंजुर रेखांकन व नगर भूमापनाच्या अभिलेखानुसार (शिट क्रमांक ३०७) विद्यानगर या रेखांकनात वरील नमूद नगर भूमापन क्रमांक १५१८९ ते १५१९४ च्या पूर्व बाजुस अंदाजे २.० मीटरची सर्व्हेस लेन दर्शविलेली आहे.

तथापी वरील नमुद प्रमाणे वस्तुस्थिती असून स्थळावर भूखंड धारकांनी भूखंड सरकवुन/अथवा गल्लीच्या जागेवर अतिक्रमण केल्याचे दिसून येते.

असे असले तरी, या रेखांकनाचा स्थळावर जवळपास पूर्णत: झालेला विकास व स्थळावर विजयनगर रेखांकनातील भूखंड धारका ज्यांचे नगर भूमापन क्रमांक १५१८७/अ-१ ते ७ यांनी तारकुंपण केल्याने, विद्यानगर रेखांकनातील वरील सहा भूखंड धारकांचा रस्ता पूर्णता बंद झाला असून त्यांना गैरसोयीला तोंड द्यावे लागत आहे. त्यास्तव स्थळावरील परिस्थिती, नागरीकांची गैरसोय पाहता विद्यानगर

रेखांकनातील वरील सहा भूखंडाच्या पश्चिम बाजुलगत व विजयनगर रेखांकनापैकीच्या भूखंड नगर भूमापन क्रमांक १५१८७/अ-२ ते १५१८७/अ-७ या भूखंडाच्या पूर्व बाजुलगत असे प्रत्येकी २.५० मीटर जागा ताब्यात घेवून, स्थळावर ५.०० मीटर रूंदीचा एकमार्गी (One plot facing road) रस्ता विद्यानगर रहीवाशांसाठी तयार करणे आवश्यक आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सविनय सादर.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : या प्रस्तावाच्या संदर्भात न्यायालयात प्रकरण चालू आहे. स्थगित करण्यात यावे.

डॉ. भागवत कराड : या प्रस्तावात असे नमूद केले की तथापी वरील नमूद प्रमाणे वस्तुस्थिती असून स्थळावर भूखंड धारकानी भूखंड सरकवून/अथवा गल्लीच्या जागेवर अतिक्रमण केल्याचे दिसून येते.ही प्रशासनाची भुमिका आहे. मा.आयुक्तांनी सुध्दा पाहणी केलेली आहे अशी माझी माहिती आहे. जर मा.आयुक्तांना तसेच संबधीत विभागास या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे असे वाटत असेल तर चार फुटाच्या गल्लीत नागरीकांनी अतिक्रमण केलेले असेल. तर माफ कशासाठी करीत आहात. ज्यांनी या रस्त्यामध्ये अतिक्रमण केलेले असेल ते काढण्यात यावे. विद्यानगर मधील काही नागरीकांना रस्ता नाही तो रस्ता करून देण्यात यावा. तेथील मंजुर लेआऊटप्रमाणे रस्ते झाले पाहिजे. ज्या वेळेस लेआऊट मंजूर झाले त्यावेळी जे नगररचनाकार असतील त्यावेळचे नकाशे सुध्दा पाहण्याची गरज आहे. न्यायालयाचा हा विषय नंतर येतो.

श्री.गजानन बारवाल : या संदर्भात न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे.महापालिकेकडे त्याची प्रत आहे.

डॉ. भागवत कराड : विद्यानगर ते जालना रोड या संदर्भात कोर्टाचा स्टे आहे परंतू इतर जे अतिक्रमण आहे ते काढणार की नाही. लेआऊट मंजूर झालेला आहे. त्याची प्रत महानगरपालिकेकडे असेलच .

श्री.गजानन बारवाल : या संदर्भात परवानगी दिलेली आहेत की नाही हे प्रशासनास अगोदर विचारणा करावी. परवानगी दिलेली असेल तर अतिक्रमण कसे म्हणता येईल.

डॉ. भागवत कराड : जेथे कूठे ले आऊट आहे तेथे रस्ता पाहिजे असे माझे मत आहे.

श्री.मनमोहसिंग ओबेरॉय : मा.आयुक्तांनी या संदर्भात निर्णय घ्यावा . स्थगिती देण्यात यावी.

श्री.संजय जोशी : आपण यात दोन-तीन बाबीची चौकशी करावी. एक तर दोन लेआऊट मंजूर केलेले आहे.दोन्ही लेआऊटला अप्रोच रोड असल्याशिवाय मंजूर करता येत नाही.

श्री.गजानन बारवाल : हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

मा.महापौर : या संदर्भात न्यायालयीन प्रकरण चालू असल्यामूळे या प्रस्तावास तुर्त स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावा संबंधी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. १४६/५ :**

सहाय्यक संचालक, नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहराच्या मंजुर (जूनी) विकास योजनेनुसार मौजे शहानुरवाडी येथील सर्व्हे नंबर १२,१३ आणि १८ पैकी च्या जागेवर एकूण क्षेत्र १.१५ हेक्टर एवढे आरक्षण क्रमांक १२३ प्राथमिक शाळा व क्रिडांगण यासाठी आरक्षित होती. शहराच्या मंजुर विकास योजना (सुधारीत) अनुसार उक्त आरक्षण क्रमांक १२३ च्या ऐवजी आरक्षण क्रमांक २५६ प्राथमिक शाळा व क्रिडांगण (क्षेत्र १.०२ हेक्टर) प्रस्तावित आहे.

उक्त सर्व्हे नंबर पैकी सर्व्हे नंबर १३/५ मौजे शहानुरवाडी येथील मधुबन गृह निर्माण संस्थेच्या मालकीची एकूण ०.८८ हेक्टर जमीनीपैकी सूमारे ०.३३ हेक्टर जमीन उक्त आरक्षणात बाधीत होते. वरील

संस्थेच्या उर्वरीत ०.५५ हेक्टरसाठी महानगरपालिकेतर्फे रेखांकन आदेश मंजूर केलेले असून त्यानुसार जागेवर विकास झाला आहे. उक्त आरक्षणात बाधीत क्षेत्र ०.३३ हेक्टर बाबत मधुबन गृह निर्माण संस्थेने ०.३३ हेक्टरच्या ४०% १३२०.०० चौ.मी.आरक्षित जमीन विना मोबदला देण्यास व उर्वरीत ६०% (१९८०.०० चौ.मी.) आरक्षित जमीन आरक्षणातून वगळून रहिवासोपयोगी करण्याची विनंती केल्यानुसार तत्कालीन मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी दिनांक २१.०६.१९९१ ला मान्यता देवून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-५० नुसार कार्यवाही करण्यास उक्त प्रस्तावास मान्यता दिली. ४०% बाधीत क्षेत्राचा ताबा करण्यास मा.आयुक्त, यांनी मान्यता दिल्यानंतर दिनांक १२.०४.१९९४ रोजी महानगरपालिकेने उक्त जागेचा ताबा पंचनामानुसार घेतला. परंतु पुढील कार्यवाही झाली नाही. महानगरपालिकेने उक्त ४०% बाधीत जागेवर आयुर्वेदीक दवाखान्याचे बांधकाम करून त्याचा मागील काही वर्षापासून जागेवर वापर चालू आहे.

उक्त आरक्षणात (क्रमांक २५६ प्राथमिक शाळा व क्रिडांगण) दक्षिणेकडील बाजूस (मधुबन गृह निर्माण संस्थेचे संपूर्ण बाधीत क्षेत्र सोडून) प्राथमिक शाळा व क्रिडांगण जागेवर विकसीत झालेले आहे.

महानगरपालिकेने मधुबन गृह निर्माण संस्था यांची सर्व्हे नंबर १३/५ मौजे शहानुरवाडी येथील जमीनीपैकी उक्त आरक्षणात बाधीत क्षेत्र ०.३३ हेक्टरच्या ४०% जागा (१३२०.०० चौ.मी.) ताब्यात घेवून त्यावर आयुर्वेदीक दवाखान्याचे बांधकाम केले आहे. करीता उक्त आरक्षणाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम -३७ नुसार फेरबदल करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे.

तरी मधुबन गृहनिर्माण संस्थेची उक्त आरक्षणात बाधीत क्षेत्र ०.३३ हेक्टर (३३००.०० चौ.मी.) च्या ६०% बाधीत क्षेत्र १९८०.०० चौ.मी. संस्थेच्या जमीनी सलग उक्त आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणे तसेच बाधीत क्षेत्र ०.३३ हेक्टर (३३००.०० चौ.मी.) च्या ४०% क्षेत्र १३२०.०० चौ.मी. उक्त गृह निर्माण संस्थेने विना मोबदला पंचनामाद्वारे महानगरपालिकेस दिलेले क्षेत्र महानगरपालिकेच्या आयुर्वेदिक दवाखाना या वापरासाठी बदल करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये पूढील कार्यवाही करणेसाठी मा.आयुक्त यांना अधिकार देणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी येथील सर्वे नं.१३/५ पैकी मधूबन गृह निर्माण संस्थेतील आरक्षण क्र.२५६ प्राथमिक शाळा व क्रिडांगण या आरक्षणाने बाधित असलेली ३३००.०० चौ.मी.पैकी ६०% बाधीत क्षेत्र सुमारे १९८०.०० चौ.मी. संस्थेच्या जमीनी लगत असलेली जमीन सदर आरक्षणातून वगळून रहीवास विभागात समाविष्ट करणे व उर्वरित ४०% बाधीत क्षेत्र १३२०.०० चौ.मी. महानगरपालिकेस विना मोबदला प्राप्त झालेली जमीन महानगरपालिकेच्या आयुर्वेदिक दवाखान्याच्या वापरासाठी ठेवण्याकरीता मंजुर विकास योजनेत बदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, तसेच सदर कार्यवाही अंतर्गत अधिसूचना काढणे,सुनावणी घेणे व अंतिम प्रस्ताव शासनास सादर करणे इत्यादी सर्व अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## स.सदस्यांचे प्रस्ताव.

**विषय क्र. १४७/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पडेगांव येथील प्रियदर्शनी कॉलनी (प्रिया कॉलनी) सर्वे नं.१३ व १३/२ हा भाग तीसगांव ग्रामपंचायतीमध्ये येतो याच कॉलनीच्या चारही बाजूचा परिसर महानगरपालिका हद्दीत येतो.

प्रियदर्शनी कॉलनीचा भाग महानगरपालिका हद्दीत समाविष्ट केल्यास मनपास कराच्या स्वरूपात आर्थिक फायदा होईल.

पडेगांव येथील तीसगांव ग्रामपंचायतीमध्ये असलेला प्रियदर्शनी कॉलनी (प्रिया कॉलनी) हा भाग महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्याकरीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन अनुमोदक : श्री.हाजी शेरखान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वे नं.१३ व १३/२ हा पडेगांव येथील तीसगांव ग्रामपंचायतीमध्ये असलेला प्रियदर्शनी कॉलनी (प्रिया कॉलनी) हा भाग महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४८/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गरमपाणी भागामधील विद्यमान प्राथमिक आरोग्य केंद्र अत्यंत अपुऱ्या जागेत असल्याने महिला रूग्णांना तपासणीसाठी योग्य व्यवस्था होवू शकत नाही. त्यामूळे विद्यमान प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतर करून पोहण्याच्या तलावालगत असलेल्या जलकुंभाजवळ महानगरपालिकेने बालवाडीलगत दोन खोल्या बांधलेल्या आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्राच्यादृष्टीने व महिला रूग्ण तपासणीच्यादृष्टीने सदर इमारत सुरक्षित आहे. तरी गरमपाणी भागातील विद्यमान प्राथमिक आरोग्य केंद्र प्रस्तावित ठिकाणी स्थलांतर करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सूचक : श्री.नासेर मो.नाहदी, श्री.अ.रशिद खान मामू

अनुमोदक : श्री.मिलींद दाभाडे, श्री.किशोर तुलशीबागवाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गरमपाणी भागामधील विद्यमान प्राथमिक आरोग्य केंद्र अत्यंत अपुऱ्या जागेत असल्याने विद्यमान प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतर करून पोहण्याच्या तलावालगत असलेल्या जलकुंभाजवळ महानगरपालिकेने बालवाडीलगत बांधलेल्या दोन खोल्या स्थलांतर करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४९/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नारळीबाग साईनाथ प्रोव्हीजन ते खरात यांच्या घरापर्यंत नविन ए.सी.जलवाहीनी टाकणे पृष्ट क्रमांक १५२ अ.क्र.१२२ वर १ लाखाची तरतूद आहे.

हे काम गुंठेवारी अंतर्गत भागातील असल्याने सध्या काम होवू शकत नाही या ऐवजी हे काम (विद्युत) वार्ड क्र.३४ येथील विद्युत दिवेची व्यवस्था करण्यात यावी, कारण विद्युत दिवेची अत्यंत आवश्यकता आहे. करीता अंदाजपत्रक रक्कम वर्ग करण्यात यावे यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन अनुमोदक : श्री.जावेद कुरैशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारळीबाग साईनाथ प्रोव्हीजन ते खरात यांच्या घरापर्यंत नविन ए.सी.जलवाहीनी टाकणेसाठी पृष्ट क्रमांक १५२ अ.क्र.१२२ वर असलेली र.रू.१.०० लाखाची तरतूद याऐवजी वार्ड क्र.३४ येथील विद्युत दिवेची व्यवस्था करण्याच्या कामासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वेधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५०/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डातील २००५-०६ अर्थसंकल्पतील,

१. अ.क्र.१७ पान क्र.१२२ स्लम ११ लक्ष मधील राहीलेले ८ लक्षामध्ये वार्ड क्र.२ मधील विविध ठिकाणी नविन खडीकरण करण्यासाठी ५.५० लक्ष तसेच

२. वार्ड क्र.२ मधील विविध ठिकाणी नविन पथदिवे तसेच जूने पथदिवे दुरूस्ती करण्यासाठी २.५० लक्ष करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करीत आहे.

सूचक : श्री.सिताराम सुरे अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २००५-०६ मधील अ.क्र.१७ पान क्र.१२२ स्लम भागासाठीच्या उर्वरीत र.रू. ८.०० लक्ष मध्ये वार्ड क्र.२ मधील विविध ठिकाणी नविन खडीकरण करणेसाठी र.रू.५.५० लक्ष व वार्ड क्र २ मधील विविध ठिकाणी नविन पथदिवे तसेच जूने पथदिवे दुरूस्ती करण्यासाठी र.रू.२.५० लक्ष वळती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५१/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लेखाशिर्षक २००५-२००६ मधील खालील कामात बदल करणेस्तव.

०१. लेखाशिर्षक २००५-२००६ मधील पान नं.१६७ वरील अ.क्र.१०५ या ऐवजी पुंडलिकनगर वार्ड क्र.८३ मधील नाल्यास संरक्षक भिंत बांधणे व स्लॅब टाकणे या कामासाठी वळती करून घेणे(र.रू.१० लक्ष)

०२. लेखाशिर्षक २००५-२००६ मधील पान नं.१८४ वरील अ.क्र.९५ याऐवजी वार्ड ८३ मध्ये विद्युत पोलवरील फिटींग व लाईट दुरूस्ती व नविन जी.आय.पोल टाकणे. (र.रू.३ लाख ५० हजार)

तरी वरील कामाच्या लेखाशिर्षकात बदल करण्यात यावा यास्तव प्रस्ताव सादर.

सूचक : सौ.संगिता विठ्ठलराव जाधव          अनुमोदक : सौ.पुष्पा बाळु शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-२००६ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. लेखाशिर्षक २००५-२००६ मधील पान नं.१६७ वरील अ.क्र.१०५ **याऐवजी** पुंडलिकनगर वार्ड क्र.८३ मधील नाल्यास संरक्षक भिंत बांधणे व स्लॅब टाकणे या कामासाठी वळती करून घेणे (र.रू.१० लक्ष)

०२. लेखाशिर्षक २००५-२००६ मधील पान नं.१८४ वरील अ.क्र.९५ **याऐवजी** वार्ड ८३ मध्ये विद्युत पोलवरील फिटींग व लाईट दुरुस्ती व नविन जी.आय.पोल टाकणे. (र.रू.३ लाख ५० हजार) वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००५-०६ या मूळ अर्थसंकल्पामध्ये का.अ.विद्युत/ड्रेनेज नविन कामे (भांडवली) पृष्ट क्र.१७९ अ.क्र.४५ अभिनंदन सोसा.येथे सेप्टीक टँक बांधणे रू.१.०० लक्ष तसेच पृष्ट क्र.१८० अ.क्र.८१ राघवेंद्र सोसा. व गंगासागर सो.मध्ये ज.नि.वाहीनी टाकणे रू.१.०० लक्ष अशी एकूण २.०० लक्षची कामे प्रस्तावित आहेत.

परंतु ही रक्कम तोडकी असल्याने वरिल एकूण प्रस्तावित रू.२.०० लक्ष मध्ये पैठण रोडवरील राघवेंद्र हाऊसींग सोसायटी या ठिकाणी जलनि:स्सारण वाहीनी टाकणेचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करावा, ही विनंती.

सूचक : सौ.अनिता घोडेले          अनुमोदक : सौ.अल्पा जैन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००५-०६ या मूळ अर्थसंकल्पामध्ये का.अ.विद्युत/ड्रेनेज नविन कामे (भांडवली) पृष्ट क्र.१७९ अ.क्र.४५ रू.१.०० लक्ष व पृष्ट क्र.१८० अ.क्र.८१ रू.१.०० लक्ष अशी एकूण २.०० लक्षची कामे प्रस्तावित आहेत. परंतु ही रक्कम तोडकी असल्याने वरिल एकूण प्रस्तावित रू.२.०० लक्ष मध्ये पैठण रोडवरील राघवेंद्र हाऊसींग सोसायटी या ठिकाणी जलनि:स्सारण वाहीनी टाकणेसाठीच्या कामासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५३/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिशानभांगण परिसर एन-२ सिडको येथे नविन वसाहत व इमारती असून या भागातील रस्त्यास नांव नसल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे. तथापी येथील नागरीक

सदरील वसाहतीस ''संत तुकोबानगर'' व त्या वसाहतीस ॲप्रोच होणाऱ्या रस्त्यास ''प्रबोधनकार ठाकरे'' मार्ग असे नामकरण करण्याकरीता प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे अनुमोदक : सौ.रजनी जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिशानभांगण परिसर एन-२ सिडको येथील नविन वसाहतीस ''संत तुकोबानगर'' व त्या वसाहतीस ॲप्रोच होणाऱ्या रस्त्यास ''प्रबोधनकार ठाकरे'' मार्ग असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५४/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका २००५ मधील नविन प्रभागाची निर्मीती करण्यात आली आहे. ह्या प्रभाग समिती मीनी महानगरपालिका असल्याने इतर पदाधिकाऱ्याप्रमाणे सभापती यांच्या कार्यालयात येणाऱ्या अभ्यगंतासाठी चहापाणी व्यवस्था करण्याकरीता पाहुणचार भत्ता म्हणून प्रत्येकी १०००/- (एक हजार रूपये) प्रती महा मंजुर करण्यात यावा.

सूचक : सौ.अंजली दिलीप कोंडेंकर अनुमोदक : श्री.संजय जगताप

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग समिती सभापती यांच्या कार्यालयात येणाऱ्या अभ्यगंतासाठी चहापाणी व्यवस्था/पाहुणचार भत्ता म्हणून प्रत्येकी १०००/- (एक हजार रूपये) प्रतीमहा देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १५५/१ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे नारेगांव येथील शासकीय जमीन गट क्रमांक ४ मधील एकूण जमीनीपैकी महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या व मालकीची १४ एकर २० गुंठे एवढी जमीन औरंगाबाद शहराच्या (वाढीव हद्द) मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार आरक्षण क्रमांक ८ Housing for Dishoused यासाठी आरक्षित आहे. उक्त जमीनीपैकी दशनाम गोसावी समाज, हिंदु समाज आणि मुसलमान समाजांना प्रत्येकी ४० आर (एक एकर जमीन) स्मशानभूमी/कब्रस्थान मा.सर्वसाधारण सभा दिनांक २७.०५.२००३ चे ठराव क्रमांक ७७/४ नुसार देण्यास मंजुरी मिळालेली असून सदर जमीन वापरा बाबत मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वये गौण फेरबदलाची कार्यवाही करण्यास मान्यता मिळालेली आहे. गौण फेरबदलाचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आलेला आहे.

महानगरपालिकेतर्फे उक्त गट क्रमांक ४ मधील एक एकर जमीन दशनाम गोसावी समाज यांच्या स्मशान भूमीसाठी देण्यात आली असून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदरील स्मशान भूमीच्या विकासाची कामे मुदतीत करून घ्यावयाची आहे. सदरील स्मशान भूमीच्या कामास सुरूवात करण्यात आली असून स्मशान भूमीसाठी नारेगाव-वरूड अस्तित्वातील (३०.०० मीटर रूंद विकास योजना रस्ता) लगत Frontage द्यावयाचा आहे. त्यासाठी दशनाम गोसावी समाजाची मागणी आहे. अस्तित्वातील नारेगाव-वरूड रस्त्याच्या दक्षिणेस गट नंबर ५ मधील त्रिकोनी जमीन १२ आर-क्षेत्र असून तेथे अनाधिकृत प्लॉटींग करून त्यावर बांधकामे झालेली आहे. त्यामधील ४ भूखंडधारकांचे एकूण Frontage ३८.१० मीटर हे उक्त स्मशान भूमीच्या समोर येत आहे. करीता उक्त स्मशान भूमीसाठी मूख्य रस्त्यावर Frontage मिळण्यासाठी वरील चार भूखंडाधारकांना महानगरपालिकेच्या मालकीच्या गट नंबर ४ मधील पूर्वेकडील भागात अस्तित्वातील नारेगांव-वरूड रस्ता (३०.०० मीटर रूंद विकास योजना रस्ता) लगतच्या जमीनीवर भूखंड देवून स्मशान भूमीसाठी Frontage उपलब्ध होवू शकतो.

सन २००५ च्या शिघ्र सिध्द गणकानुसार गट नंबर ५ चे दर रूपये ५००/- चौ.मी. आणि गट नंबर ४ चे दर रूपये ३००/- चौ.मी. असे आहे. संबंधीतांना त्यांच्या जागेच्या मुल्याएवढी जागा गट क्रमांक ४ मध्ये वरील दराच्या प्रमाणानुसार जागा देण्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

चार संबंधीताच्या जमीनीचे एकूण क्षेत्र ५८२.६९ चौ.मी. असून वरील नमूद दराच्या प्रमाणात गट क्रमांक ४ मध्ये देण्यात येणारे क्षेत्र ७४७.७३ चौ.मी. येते.

सबब प्रकरणात पुढील कार्यवाही होणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मुजीब खान : ही जी जागा घेतलेली आहे. ही व्यक्ती माझ्या वार्डातील आहे. मा.आयुक्त यांनी तडजोड करण्यासाठी स्मशानसाठी समोरची फ्रंट साईडची जागा होती जी घरे वगैरे झालेली होती. ही जमीन व आजूबाजू जी जागा आहे त्या मोबदल्यात ही जागा देत आहोत. संबधीतास बोलवून मा.आयुक्तांनीचर्चा केलेली होती. की , या बाबत मोबदला देवू .रोडच्या साईडचा भाग होता जो ५०० रूपये स्क्वेअर फुट प्रमाणे होता. महानगरपालिकेची जी जागा आहे ती आतल्या भागात होती. मा.आयुक्तांना ती जागा दाखवलेली होती. व त्या जमिनीच्या मोबदल्यास त्या जमिनीच्या किमंतीनुसार जागा जमिन देवू परंतू ठरावामध्ये ९६३ चौ. मीटर यावयास पाहिजे. होते परंतू ७४७ .७३ चौ. मी. नमूद केलेले आहे. ज्या अर्थी चर्चा झालेली होती. जास्त जागा मिळावयास पाहिजे होती. प्लॉटपेक्षा कमी जागा दिली जात आहे.

मा.आयुक्त : रेडीरेकनर प्रमाणे जी जमीन घेत आहे त्याची किती किमंत होत आहे व जी देत आहे त्याची सुध्दा रेडीरेकनर प्रमाणे किती किंमत होत आहे. त्याप्रमाणे काढलेले आहे. खर्चाच्या प्रमाणात जमिन कमी देत आहोत.

श्री.मुजीब खान :संबधीता बरोबर असे बोलणे झाले होते की आपल्या जमिनीची किमंत जास्त आहे. त्याप्रमाणे जागा देण्यात येईल.

मा.आयुक्त :संबधीताची जमीन ही ५८२ चौ.मीटर आहे. त्याची किमंत ५०० रूपये आहे महापालिकेच्या जागेची किमत ३०० प्रमाणे आहे.म्हणून ५८२ चौ. मी. ऐवजी त्यांना ७४७.७३ चौ.मी. देत आहे.

श्री.मुजीब खान : ७४७ चौ. मीटर येत नाही. ९६३ चौ. मीटर होते. पून्हा कॅल्क्यूलेट करावे.

श्री.तरविंदरसिंग धिल्लन : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

सहा. संचालक(न.र.) :जमिनीची किमंत काढताना संबधीतांची जमिन जी घेत आहोत त्याचे डिडक्शन केलेले आहे. उदा.साठी एका प्लॉटचे माहिती वाचून दाखविण्यात येते. भूंखड क्र १ २७ फुट ६ इंच बाय ५० फुट,याचं १३३० चौ.फुट क्षेत्र येते. म्हणजेच १२८.२५ चौ. मीटर,गट क्र ५ चे दर हे ५०० रूपये प्रति चौ. मीटर आहे. १२८.२५ चौ. मीटर ला ५०० रूपयेचा गुणाकार केल्यास एकूण ६४,०००/-किंमत येते. गट क्र. ४ चे दर हे प्रति चौ.मीटर ३०० रूपये आहे. १२८.२५ चौ. मीटर ला ३०० रूपयेचा गुणाकार केल्यास त्याची ३८,४७६ रूपये किंमत येते. फरक जो येतो तो २५,६४९ रूपयाचा येतो. तथापी सदर जागेची आदला बदल, खरेदी खताचा खर्च ५० टक्के महानगरपालिका व ५० टक्के मिळकत धारक यांना करावा लागेल तसेच २० टक्के विकासकाचा फायदा प्रॉफिट तसेच लिगल चार्जेस याची मधील रक्कमेतून कमी करावी लागेल. २० टक्के रक्कम ही १२,८२५ रूपये येते. खरेदीखताचा खर्च हा ५० टक्के प्रमाणे १९३० रूपये. स्टॅम्प डयुटी ५ टक्के ३२१० रूपये ,यात १४,७५५ रूपये वजा करणार आहोत. २५,००० रूपये मधून रूपये १४,७५५ कमी केल्यास रूपये १०,८९४ हा किमंतीचा फरक येतो.

श्री.मुजीब खान :एका व्यक्तीला बोलवून वाटाघाटी केली जाते. त्यांना सांगितले जाते की आपल्या हिशोबा प्रमाणे जागा दिली जाईल. पून्हा इतर खर्च लावण्यात येतो. रजिष्ट्रीचा खर्च

संबधीत व्यक्ती करतील. इतर जो विकास खर्च वगैरे का संबधीताकडून घेण्यात येत आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :एका संबधीत व्यक्तीचा हा प्रश्न नसून संपूर्ण एका समाजाच्या संबधीत हा प्रश्न आहे. संबधीत व्यक्तीला मोबदला देण्यासंदर्भात काही मतभेद असतील. तर पून्हा त्यांना चर्चेसाठी बोलविण्यात यावे. आणखी काही सुविधा संबधीत व्यक्तीला महानगरपालिकेच्या वतीने देता आली तर तशी कार्यवाही करावी. परंतू सदर ठिकाणी रस्ता देणे अत्यावश्यक आहे. त्यामूळे रस्त्यासाठी जागा भूसंपादन करण्यास मान्यता दयावी.

श्री.मुजीब खान : संबधीतास वाटाघाटी साठी बोलविण्यात आले होते. चर्चा ही केलेली होती त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. जागा घेण्यासाठी जो खर्च येतो तो संबधीतांकडून घेण्यात येणार आहे. विकास चार्जेस लावण्यात येवू नये. खर्च वेगळा घ्यावा. खर्चात जमिन कमी करू नये, बांधलेले घर तोडले, त्याचे विकास खर्च कसे देण्यात येईल. घर बांधणीसाठी पैसे देत नाही. एक तर त्यांना स्थलांतर करण्यात येत आहे. रजिष्ट्रीचा खर्च जमिन मालक देईल, त्यांना ९६३ चौ.मी. जमीन द्यावी.

सहा. संचालक (न.र.) : सुविधा देत आहोत. डेव्हलपमेंन्ट चार्जेस वसूल करावे लागतील.

मा.महापौर : विषय दुरूस्तीसह मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे मौ.नारेगांव येथिल गट नं. ५ पैकी दशनाम गोसावी समाजाच्या स्मशान भूमीसाठी ५८२.६९ चौ. मी जमिन घेण्यास आणि तेवढयाच किंमतीची स.नं. ४ नारेगांव ९६३.०० चौ. मी जमिन संपादित जमिनीच्या मालकास देण्यास, अदलाबदल दस्तऐवज करण्यासाठी संबधीतांनी व महानगरपालिकने ५०:५० टक्के खर्च करण्यास दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५६/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनरूज्जीवन अभियान ही योजना केंद्र शासनाची योजना असून राज्य शासन व केंद्र शासनाकडून विविध योजने अंतर्गत दिले जाणारे अर्थ सहाय्य बंद करून ही सर्व समावेशक योजना केंद्र शासनाने दिनांक ०३ डिसेबंर २००५ रोजी घोषीत केलेली आहे. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनरूज्जीवन अभियानात भाग घेण्यासाठी महानगरपालिकेने शहरासाठी २०२५ पर्यंतचा विकास आराखडा तयार करणे गरजेचे आहे. या अभियानातंर्गत केंद्र शासनाने निर्देशित केलेल्या अनिवार्य सुधारणा (Mandatory Reforms) पूर्ण करणे बद्दल कटीबध्दता दर्शविणे व यासाठी कालमर्यादा (वेळापत्रक) कळविणे आवश्यक आहे. वरील बाबींची पूर्तता केल्यानंतर विकास आराखड्यास सुसंगत असलेले विविध विकास प्रकल्प अर्थसहाय्यासाठी या अभियाना अंतर्गत पाठविण्यात येईल. यासाठी प्रशासनाने मा.महापौर व मा.पदाधिकारी यांचे समवेत चर्चा करून शहरातील विविध क्षेत्रातील तज्ञ,पालिका सदस्य (महिला पालिका सदस्यासह), पत्रकार व इतर जाणकारांचे सूचना व विचार,संकल्पना व दृष्टीकोन विचारात घेवून प्रारूप विकास आराखडा तयार केला असून ते मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

धोरणात्मकदृष्ट्या ते मंजुर झाल्यानंतर केंद्र शासनाला अपेक्षित नमुन्यात विकास आराखडा अंतिम करून व त्यात आवश्यक त्या सुधारणा/बदल करून मा.महापौर यांचे मान्यतेने हा आराखडा शासनास सादर करण्यात येईल. याचबरोबर सोबत जोडलेल्या प्रमाणे अनिवार्य सुधारणा (Mandatory Reforms) मान्य करण्याचा प्रस्ताव असून मान्यतेनंतर राज्य शासन व केंद्र शासन यांचेशी मा.महापौर व मा.पदाधिकारी यांच्या मान्यतेने करारनामा (M.O.A.[Memorandum of Agreement]) करण्यात येईल. तसेच याच बरोबर खालील प्रकल्प हे विकास आराखड्यास अनुरूप असून त्यात नमुद अग्रक्रमाप्रमाणे असून त्यास केंद्र शासनास अनुदानासाठी पाठविण्याकरीता मंजुरी मिळावी.

०१. पाणी पुरवठा-समांतर जलवाहीनी, वितरण व्यवस्था सुधारणा व मजबुतीकरण.

०२. जलनि:स्सारण प्रकल्प

०३. घनकचरा व्यवस्थापन

०४. शहर बस वाहतुक

०५. झोपडपट्टी विकास अंतर्गत एक हजार घरे बांधणे

तसेच या व्यतिरिक्त अनुदान मिळणेसाठी विकास आराखड्यास अनुरूप असलेले जे जे प्रस्ताव पाठवायचे असतील, ते प्रस्ताव मा.महापौरांच्या मान्यतेने पाठविण्यासही मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूज्जीवन अभियाना अंतर्गत सन२०२५ दृष्टीक्षेपातील औरंगाबादसाठी सादर केलेल्या विकास आराखड्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या योजनेअंतर्गत राज्य शासनामार्फत केंद्र शासनास प्रस्ताव पाठविण्यासाठी अपेक्षित नमुन्यात तयार करून त्यात आवश्यक त्या सुधारणा/बदल करून मा.महापौर यांचे मान्यतेने शासनास सादर करण्यास आणि सदर योजने संदर्भात अनिवार्य सुधारणा मान्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते आणि यासाठी करावा लागणारा करारनामा (M.O.A.) मा.महापौर व मा.पदाधिकारी यांच्या मान्यतेने करण्यास आणि प्रस्तावात दर्शविलेले अ.क्र.१ ते ५ व त्यानंतर अर्थसहाय्य मिळण्यासाठी विकास आराखड्यास अनुसरून असलेले प्रस्ताव मा.महापौर यांच्या मान्यतेने वेळोवेळी पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : प्रशासनाचे व स.सदस्यांचे जे काही ऐनवेळचे विषय असतील ते सर्व मंजुर करण्यांत येत आहे.

**विषय क्र. १५७/३ :**

औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेने विषय क्र.१४०/१ दिनांक २१.१२.९९ रोजी ठराव पारित करून औरंगाबाद सिडको अधिसूचित क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून घेण्यासाठी काही अटीवर मान्यता दिलेली आहे. उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने शासनाने शासन निर्णय क्र.डीओसी/१०९५/७५९/प्र.क्र.-१६५/नवि-१०, दिनांक १२ जुलै २००१ रोजी सिडकोने औरंगाबाद महानगरपालिकेला रू.४.५० कोटी प्रदान करावे व प्रशासकीय इमारतीची एक विंग (Wing) कोणतीही किमंत न आकारता सिडकोने औरंगाबाद महानगरपालिकेला, त्यांचे विभागीय कार्यालय सुरू करण्याकरीता द्यावे असा अद्यादेश काढलेला आहे.

उपरोक्त आदेशानंतर औरंगाबाद महानगरपालिका व सिडको अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे रस्ते, खूल्या जागा, उद्याने,खेळाचे मैदान, जलनि:सारण इत्यादी बाबतची पाहणी केली होती. त्या दरम्यानच मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ यांचेकडे सिडको अधिसूचित क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम हटविण्याबाबत व खूल्या जागेवरील अतिक्रमणाबाबत जनहीत याचिका क्र.४२१/८६ सुनावणीमध्ये होती. त्यामध्ये दिनांक ०५.०९.२००१ रोजी मा.उच्च न्यायालयाने सिडको अधिसूचित क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे पाडणे बाबत आदेश दिला व महानगरपालिका व सिडको यांना हस्तांतरण बाबतची कार्यवाही थांबविणे बाबतचाही आदेश दिला.

दिनांक २३.०७.२००४ रोजी मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सिडको हस्तांतरणाबाबत औरंगाबाद महानगरपालिकेच्या पदाधिकारी व सिडको प्रशासक यांचेशी सविस्तर चर्चा करून वरील संदर्भिय तारखेस त्यांनी असे निर्देश दिले होते की, सिडको हस्तांतरणाचे काम हे अंतिम टप्प्यात आले असून आता सिडको व महानगरपालिका अधिकाऱ्यांनी संयूक्त पाहणी करून करावयाच्या विकास कामासाठी एक निश्चित रक्कम ठरवावी, या अनुषंगाने परत एकदा औरंगाबाद महानगरपालिका व सिडकोच्या अधिकाऱ्यांनी कामाची संयूक्त पाहणी केली. औरंगाबाद महानगरपालिकेला सिडको भागातील कामे करण्यासाठी सिडको कडून रक्कम रूपये ४९ कोटी २० लाख एवढी रक्कम मिळावी म्हणून महानगरपालिकेने सिडकोस

दिनांक २२.०७.२००५ रोजी पत्र देखील दिले आहे. तथापी उपरोक्त रक्कम ही अवास्तव असून शासन निर्णयाच्या विसंगत आहे. म्हणून सिडकोने कळविले होते.

यानंतर मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांच्याकडे दिनांक २६.१०.२००५ रोजी उपरोक्त संदर्भाने मुंबई येथे बैठक झालेली आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी सिडको हस्तांतरण संबंधी दिनांक ०५.०९.२००१ रोजी जो प्रतिबंध आदेश दिला होता तो आदेश दिनांक १७.१२.२००४ रोजी व्हॅकेट केला आहे.

शासन निर्णय क्र.मविका-२००५/प्र.१९४/का.१४५६ दिनांक २३ नोव्हेबंर २००५ नुसार मराठवाडा एकात्मिक विकास कार्यक्रमाअंतर्गत महानगरपालिका औरंगाबादसाठी सन २००५-२००६ साठी रूपये २५ कोटी रूपयाचा निधी मंजूर झालेला आहे. तथापी त्यामध्ये महानगरपालिकेने औरंगाबाद सिडको विकसीत केलेला भाग व्यवस्थापनासाठी ताब्यात घेणे ही अट आहे.

दिनांक १९.०१.२००६ रोजी मुंबई येथे मा.प्रधान सचिव नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका तसेच व्यवस्थापकिय संचालक सिडको यांची सिडको हस्तांतरणाबाबत बैठक झाली या बैठकीत सिडकोने औरंगाबाद महानगरपालिकेला, औरंगाबाद सिडको अधिसूचित क्षेत्राचे हस्तांतरण करून घेण्यासाठी रक्कम रू.१५ कोटी द्यावे, असे ठरले.

करिता सिडको औरंगाबाद अधिसूचित क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून घेण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. प्रस्ताव मंजुरीनंतर सिडको हस्तांतरण करून घेण्यासाठीच्या अटी व शर्ती मान्य करण्याचे महानगरपालिका,आयुक्त यांना अधिकार देणे बाबत मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्यासाठी सिडको प्राधिकरण महानगरपालिकेस रू.१५ कोटी देणार असून हे १५ कोटी मान्य करून हस्तांतरणानंतर या भागासाठी विकास परवानगी महानगरपालिकेतर्फे दिली जाईल, सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांरणासंदर्भात करारनाम्यातील अटी, शर्तीची सुधारणा करणे, अथवा बदल करणेचा अधिकार महानगरपालिकेचे पदाधिकारी व आयुक्त यांना राहील, आणि याप्रमाणे अटी व शर्ती मान्य करण्याचे व आवश्यकता पडल्यास करारनामा करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यासह सदर प्रस्तावास स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १५८/४ :</u>**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, जवाहर कॉलनी पोलीस स्टेशन ते गजानन महाराज मंदिर रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या २००४-०५ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून, कामाचे अंदाजपत्रक रू. ३७,८०,९१०/- चे तयार करण्यात आलेले आहे.

प्रस्तावित कामासाठी सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात रू. १० लक्ष एवढी तरतूद उपलब्ध करण्यात आलेली आहे, परंतू सदर रू. १० लक्ष एवढी तरतूद प्रस्तावित कामांकरिता अपुरी आहे. त्यामुळे सन २००५-०६ या आर्थिक वर्षात या कामावर रू. १० लक्ष मर्यादेपर्यंत खर्च करण्यात येईल व उर्वरीत रक्कम रू. २७,८०,९१०/- सन २००५-०६ या आर्थिक वर्षात करण्यात येईल व तशी तरतूद २००६-०७ च्या अर्थसंकल्पात करण्यात येईल. तरी रू. ३७,८०,९१०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जवाहर कॉलनी पोलीस स्टेशन ते गजानन महाराज मंदिर रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणेच्या र.रू.३७,८०,९१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, तसेच सन २००५-२००६ च्या आर्थिक वर्षात रू.१०.०० लक्ष पर्यंत खर्च करण्यास आणि उर्वरित रक्कम रू.२७,८०,९१०/- ची तरतूद सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पात करण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९/५ :**

नागरी दलित वस्ती सुधारणा योजना ही जिल्हास्तरीय व विशेष घटकातील लाभार्थीसाठी राज्य शासनाने जाहीर केलेली योजना असून, या योजने अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील अनुसूचीत जाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षीत असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचीत जातीच्या राखीव प्रभागशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसूचीत जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५० % किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा वस्त्यांमध्ये खालील नागरी सुविधांची कामे हाती घेण्यात येऊ शकतात.

१. पथदिव्यांची कामे.
२. बालवाडी.
३. बगीचे, बगीच्यामध्ये पक्क्या स्वरूपात बसविण्याची खेळणी.
४. समाज मंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने, सांस्कृतिक केंद्र, दुकाने इत्यादी इमारती बांधणे.
५. स्मशानभूमीचा विकास.
६. नाली बांधकाम.
७. लहान नालीवर फ़रशी बांधणे.
८. नाल्यास संरक्षीत भिंत बांधणे.

उपरोक्त नमूद प्रकारच्या कामांसाठी राज्य शासनाने शासन निर्णय नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंमलबजावणी करिता मार्गदर्शक तत्वे विहीत करणे विघयो-१०२०००/१५९२/ प्र.क्र.१८९/ नवि-४ दिनांक ०५.०३.२००२ अन्वये प्रसिध्द केला आहे. यातील नमूद मार्गदर्शक तत्वानुसार महानगरपालिकेस रूपये १००.०० लाखापर्यंत कमाल अनुज्ञेय अनुदान प्राप्त होऊ शकते. सदर अनुदान प्राप्त होण्यासाठी वरील नमूद शासन निर्णयातील कलम ७ नुसार कार्यपध्दतीचा अवलंब करणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने सदरचे अनुदानातून सहभाग नोंदविणे साठी वॉर्ड क्र. ८० अंबीकानगर, मुकूंदवाडी या अनुसूचीत जातीसाठी राखीव असलेल्या वार्डात नागरी सुविधांसाठी खालील कामे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | मुकूंदवाडी आणि संतोषीमातानगर वस्तीलगतच्या नाल्यास संरक्षीत भिंत बांधणे. | २९,९५,१५०/- |
| २ | अंबिकानगर, मुकूंदवाडी येथे पथदिव्यांची व्यवस्था करणे. (रूपये ५,०९,७७०+५,००,०००) | १०,०९,७७०/- |
| ३ | वार्ड क्र. ८०, संतोषीमातानगर आणि राजीवगांधीनगर (मुकूंदवाडी) येथे भुमिगत ड्रेनेज लाईन टाकणे. | १४,९५,०००/- |

उपरोक्त अ.क्र. १,२ व ३ साठी एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ५४,९९,९२०/- एवढी होते. वरील कामांना अनुदान अनुज्ञेय होणे साठी प्रस्तावित कामांची निवड व निश्चिती करणारा सर्व साधारण सभेचा ठराव पारीत होणे आवश्यक आहे. त्यानंतर शासन निर्णयातील कलम ७ मधील (३) च्या तरतूदीनुसार मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे निधीच्या उपलब्धेसाठी सादर करण्यात येईल.

करिता उपरोक्त नमूद कामांची नागरी दलितवस्ती सुधारणा योजनेच्या कामासाठी निवड व निश्चिती करण्यासाठीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभे पुढे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अ.क्र. १ ते ३ रक्कम रू.५४,९९,९२०/- ची कामे नागरी दलित वस्ती सुधारणा, जिल्हास्तरीय व विशेष घटकांतील लाभार्थीसाठी शासनाने जाहीर केलेल्या योजनेतून वरिल कामांना रू.५४,९९,९२०/- इतके अनुदान अनुज्ञेय होणेसाठी प्रस्तावित कामांची निवड करण्यास व

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे सदर निधी उपलब्धतेसाठी मागणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६०/६ :**

आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महापालिकेतर्फे शहर सुंदर व स्वच्छ दिसावे यासासाठी सफ़ाई कामगारांकडून प्रभावी पणे जादा तास काम करून घेणे गरजेचे आहे. सफ़ाई मजुराकडून जास्तीचे काम करून घेतल्यास त्यांना अतिरिक्त कामांचा मोबदला महानगरपालिकेतर्फे अदा करण्यात येत नाही.

वर्ग चार संवर्गातील शिपाई या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रू. ०४.०० प्रति तास अदा करण्यात येत आहे.

सफ़ाई कामगारांना कार्यालयातर्फे रू. १२.५० प्रति तास प्रमाणे जास्तीत जास्त प्रतिदिन चार तास अतिरिक्त कामाचे रू. ५०.०० प्रमाणे मोबदला स्वरूपात अदा करावा लागेल सदरील निर्णय हा धोरणात्मक स्वरूपाचा असल्यामुळे मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वर्ग चार संवर्गातील शिपाई या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रू. ०४.०० प्रति तास अदा करण्यात येत असल्यामूळे सफ़ाई कामगारांकडून प्रभावीपणे जादा तास काम करून घेणेसाठी, सफ़ाई कामगारांना कार्यालयातर्फे रू. १२.५० प्रति तास प्रमाणे जास्तीत जास्त प्रतिदिन चार तास अतिरिक्त कामाचे रू. ५०.०० प्रमाणे मोबदला स्वरूपात अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६१/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, जुनाबाजार येथील आरक्षण क्र. ६२ येथे उद्यान विकसीत करणेच्या कामाचे अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभा दिनांक २४.११.२००५ च्या विषय क्र. ११५/४ च्या मंजुरीनुसार व सा.बां. विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हादरसुचीनुसार रक्कम रूपये ४९,९७,०६०/- चे तयार करण्यात आलेले असुन सदर अंदाजपत्रक मे. वर्मा ग्रुप ऑफ़ कंन्स्लटंसी यांना निविदा रक्कमेच्या १.५% वास्तुविशारद फ़िस म्हणुन देण्याच्या अटीवर त्यांच्या मार्फ़त तयार करून घेण्यात आलेले आहे.

सदर अंदाजपत्रकामध्ये उदयानाच्या स्थापत्य कामासाठी, विदयुतीकरण तसेच वृक्षसंवर्धन व वास्तुविशारद फ़िस साठी अनुक्रमे रक्कम रूपये ४४,८५,०६०/-, २,५०,०००/-, १,५०,०००/- व १,१२,०००/- ची तरतुद समाविष्ठ करण्यात आलेली आहे.

करिता जुनाबाजार येथील आरक्षण क्र. ६२ येथे उदयान विकसीत करणेच्या कामाचे रक्कम रूपये ४९,९७,०६०/-चे एकत्रित अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथापि मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जुनाबाजार येथील आरक्षण क्र. ६२ येथे उदयान विकसीत करणेच्या कामाचे रक्कम रूपये ४९,९७,०६०/- चे एकत्रित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६२/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, अल्पबचत प्रोत्साहनपर अनुदानाचे वाटप सन २००३-०४ अंतर्गत अल्पबचत गुंतवणूक इष्टांक जिल्ह्यांनी पूर्ण केल्याबद्दल जिल्ह्यांना प्रोत्साहनपर अनुदान शासनाकडुन मंजुर करण्यात येतात त्यानुसार औरंगाबाद जिल्ह्यास अल्पबचत गुंतवणूक इष्टांक पुर्ण केल्याबद्दल शासनाकडून प्राप्त अनुदानातून व मागील वर्षाची शिल्लक रक्कमेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेस रक्कम रूपये २,५६,५४०/- चे अनुदान देय असुन सदर अनुदान शासनाने खालील प्रमाणे विहीत केलेल्या बाबीवरच खर्च करण्याबाबत कळविलेले आहे.

अ) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या/शासकीय मालकीच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा खोल्या प्रयोगशाळा बांधणे.

ब) शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थाने प्राथमिक आरोग्य पथक, दवाखाने यासाठी नविन इमारती बांधणे, खोल्या बांधणे.

क) विद्यार्थ्यांकरिता वसतीगृह बांधणे.

ड) नगरपालिका क्षेत्रामध्ये बगीचा, अल्पबचत चौक, सायकल स्टँड बांधणे.

इ) वाचनालयासाठी इमारत बांधणे.

उपरोक्त विहीत बाबीस व औरंगाबाद महानगरपालिकेस देय असलेल्या रक्कम रूपये २,५६,५४०/- च्या अनुदानाच्या अधिनस्त मनपातर्फे मनपाच्या सर्व्हे नं. १२, शहानुरवाडी येथील मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत नागरीकांच्या सोयीसाठी वाचनालय बांधण्याचे रक्कम रूपये २,४९,५००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात येवून त्यास मंजुरीस्तव मनपातर्फे जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय अल्पबचत विभाग, औरंगाबाद यांच्या कडे पाठविण्यात आले असता जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर विकास कामाचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेत पारीत करून व मनपाच्या नगररचना विभागाने सदर ठिकाणी वाचनालय इमारत बांधण्यास नाहरकत प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याबाबत कळविले असून त्यानुसार मनपाच्या नगररचना विभागाचा अभिप्राय घेवून त्या बाबत नाहरकत प्रमाणपत्र देखील घेतले आहे.

करिता मनपाच्या सर्व्हे नं. १२, शहानुरवाडी येथील मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत अल्पबचत प्रोत्साहनपर अनुदानातून मनपास प्राप्त होणाऱ्या रक्कम रूपये २,५६,५४०/- अंतर्गत रक्कम रूपये २,४९,५००/- च्या वाचनालय बांधकामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यासाठीचा व सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मंजुरीस्तव पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेच्या सर्व्हे नं. १२, शहानुरवाडी येथील मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत अल्पबचत प्रोत्साहनपर अनुदानातून महापालिकेस प्राप्त होणाऱ्या र.रू.२,५६,५४०/- अंतर्गत रक्कम रूपये २,४९,५००/- च्या वाचनालय बांधकामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते, व सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मंजुरीस्तव पाठविण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६३/९ :**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, एन-२ परिसर, सदाशिवनगर व रामनगर परिसरासाठी एन-५ जलकुंभ ते रामगिरी हॉटेल पर्यंत ४०० मी.मी. व्यासाची डी.आय.के-९ जलवाहीनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू. २१,९२,३००/- चे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचे सन २००५-०६ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असून या कामावर होणारा खर्च अर्थसंकल्प २००५-०६ मधील भांडवली कामे पाणीपुरवठा या लेखाशिर्षकातील पृष्ठ क्रमांक १६६ चे अ.क्र. ९९ वर ठेवण्यात आलेले २२.०० लाखाचे तरतूदीमधून करण्यात येणार आहे.

एन-५ जलकुंभ ते रामगिरी हॉटेल पर्यत समांतर ४०० मी.मी. व्यासाची डी.आय.के-९ जलवाहीनी टाकण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू. २१,९२,३००/- चे सर्वसधारण सभेचे मान्यतेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-५ जलकुंभ ते रामगिरी हॉटेल पर्यत समांतर ४०० मी.मी. व्यासाची डी.आय.के-९ जलवाहीनी टाकण्याचे रक्कम रू. २१,९२,३००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४/१० :**

उप आयुक्त (महसुल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जाफ़रगेट येथील रविवार बाजार व कडबा मंडी जागेवर असलेली कडबा मंडी ही शहराच्या मध्यवर्ती भागात असल्यामुळे त्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होते, तेथे येणारे ट्रक, ट्रॅक्टर,बैलगाड्या, रिक्षा इ. मुळे वाहतूक खोळंबते, तसेच त्या ठिकाणी होणाऱ्या पाणीमुळे त्या भागातील नागरीकांच्या आरोग्यास धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या ठिकाणी येणाऱ्या पाण्यामुळे येणारी जनावरे व त्यांचे पडणारे मलमुत्रांमुळे ही दुर्गंधी पसरून मध्य वस्तीतील भाग हा आरोग्यासाठी धोकादायक होतो. करिता ही कडबा मंडी शहराबाहेर स्थलांतरित करणे अत्यंत आवश्यक आहे.

औरंगाबाद शहराच्या पूर्वेस असलेल्या जाधववाडी भागात औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीने त्यांच्या जागेत कडबा मंडी साठी ही त्यांची जबाबदारी असलेले आरक्षण ठेवले आहे. तसेच कडबा मंडी हा प्रकल्प कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अंतर्गत येतो. अशा प्रकारे इतर महानगरपालिकांतही कडबा मंड्या कृषी उत्पन्न बाजार समिती च्या आवारात आहेत. तरी औरंगाबाद शहरात मध्य वस्तीत जाफ़रगेट भागात असलेली कडबा मंडी बंद करणेचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव सादर करत आहे. तसेच प्रस्ताव मान्यतेनंतर त्याबाबतच्या सूचना व हरकती ऐकून त्यावर कार्यवाहीस्तव निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यांत येणेचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या पूर्वेस असलेल्या जाधववाडी भागात औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीने त्यांच्या जागेत कडबा मंडी साठी आरक्षण ठेवले आहे. तसेच कडबा मंडी हा प्रकल्प कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अंतर्गत येतो. अशा प्रकारे इतर महानगरपालिकांतही कडबा मंड्या कृषी उत्पन्न बाजार समिती च्या आवारात आहेत. तरी औरंगाबाद शहरात मध्य वस्तीत जाफ़रगेट भागात असलेली कडबा मंडी बंद करणेस तसेच त्याबाबतच्या सूचना व हरकती ऐकून त्यावर कार्यवाहीस्तव निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सफ़ाई मजूर संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या मान्यता उक्त कर्मचारी स्वेच्छा निवृत्ती/रूग्णता सेवानिवृत्ती/नियत वयोमानाने किंवा मृत्युनंतर लाड समितीच्या शिफ़ारसीनुसार दिनांक ३०/०६/९४ च्या शासन निर्णयान्वये व वेळोवेळी शासनाचे सुधारित आदेशानुसार त्यांच्या पाल्यांना अनुकंपावर नियुक्ती देण्याची तरतूद आहे. उक्त शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अर्जांची अनुकंपावर नियुक्ती देण्यासाठी प्रकरणांची छाननी करून सोबतच्या यादीत नमूद केलेली प्रकरणे अनुकंपावर नियुक्ती देण्यासाठी पात्र आढळून आलेली आहे.

करिता सोबतच्या यादीतील अनुकंपा तत्वावरील प्रकरणांतील निवड केलेल्या उमेदवारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये सफ़ाई मजूर या पदावर नियुक्ती सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मान्यतेस्तव देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**वारसा पध्दतीने नियुक्ती दिलेल्या प्रकरणांची यादी (४७)**

| अ. क्र. | सेवानिवृत्त (मयत) कर्मचाऱ्याचे नांव | सेवानिवृत्ती/ मयत दिनांक | पदनाम | अर्जदाराचे नांव | अर्जाचा दिनांक | नाते |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लिलाबाई रतन ताकवाले | ३१.७.२००५ स्वे.से.नि. | मजूर | रमेश रतन ताकवाले | २२.८.२००५ | मुलगा |
| २ | बापु सुंदरलाल साबळे | ५.९.२००५ स्वे.से.नि. | मजूर | विजय बापू साबळ | ८.९.२००५ | मुलगा |
| ३ | रंगनाथ दगडू हिवराळे | २०.७.२००५ स्वे.से.नि. | मजूर | धनराज रंगनाथ हिवराळे | ८.९.२००५ | मुलगा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | सुखदेव भाऊराव मोरे | १२.२.२००५ मृत्यु | मजूर जा.पा.पू. | महेंद्र सुखदेव मोरे | ८.९.२००५ | मुलगा |
| ५ | वेणुबाई बाबुराव मगरे | ३१.७.२००५ से.नि. | मजूर | अनिल बाबुराव मगरे | १४.९.२००५ | मुलगा |
| ६ | शेख दादा मोईनोद्दीन | २०.९.२००५ स्वे.से.नि. | मलेरिया मजूर | शेख अनवर शेख दादा | २१.९.२००५ | मुलगा |
| ७ | भिमराव बाजीराव तुपे | १३.५.२००५ मृत्यु | मजूर पा.पू. | सुनिल भिमराव तुपे | २१.९.२००५ | मुलगा |
| ८ | किसन महादू घुसळे | २०.९.२००५ से.नि. | मजूर | किशोर किसन घुसळे | २१.९.२००५ | मुलगा |
| ९ | मधुकर तुपे | ३१.८.२००५ स्वे.से.नि. | मलेरिया मजूर | पवन मधुकर तुपे | २१.९.२००५ | मुलगा |
| १० | कौशल्या मुकूंद जाधव | ३०.९.२००५ स्वे.से.नि. | मजूर | बबन मुकूंद जाधव | ५.१०.२००५ | मुलगा |
| ११ | कामीनीबाई अण्णा जाधव | २०.९.२००५ स्वे.से.नि. | मजूरीन | किसन अण्णा जाधव | ५.१०.२००५ | मुलगा |
| १२ | अंबादास पुंजाजी मिसाळ | ३०.९.२००५ से.नि. | मजूर | प्रकाश अंबादास मिसाळ | ५.१०.२००५ | मुलगा |
| १३ | मुकेश सुरजमल लव्हेरा | १९.२.२००५ मृत्यु | स्वीपर | मिनाबाई मुकेश लव्हेरा | ५.१०.२००४ | पत्नी |
| १४ | मालनबाई छगन म्हस्के | १.८.२००५ स्वे.से.नि. | मजूरीन | संतीश छगन म्हस्के | ५.१०.२००५ | मुलगा |
| १५ | तुकाराम यशवंत नरवडे | ८.६.२००५ मृत्यु | मजूर यांत्रिकी | विजय तुकाराम नरवडे | २७.१०.२००५ | मुलगा |
| १६ | मोहमंद उमर मो.हुसेन | ३१.८.२००५ स्वेच्छा से.नि. | सफाई मजूर | मो.सईद मो.उमर | ५.१०.२००५ | मुलगा |
| १७ | छबाबाई रतन मिसाळ | ३०.९.२००५ स्वे.से.नि. | सफाई मजूर | अनिल रतन मिसाळ | १.१०.२००५ | मुलगा |
| १८ | पंढरीनाथ बोर्डे | ३१.१.०५/ स्वे.से.नि. | मजूर | नंदलाल चुन्नीलाल बुंदीले | ०१.२.०५ | दत्तक मुलगा |
| १९ | मंजुळाबाई मोहन जाधव | ३१.१.०५/ स्वे.से.नि. | मजूर | गायकवाड शाम निवृत्ती | ०१.२.०५ | मुलगा |
| २० | अहेमद खॉ | २८.२.०५/ स्वे.से.नि. | मलेरिया मजूर | अमजदखॉ अहमद खॉ | २८.४.०५ | मुलगा |
| २१ | नागु हरकेश धिल्लोड | ६.१२.२००४ मृत्यु | स्वीपर | आशा नागू धिल्लोड | ५.५.२००५ | पत्नी |
| २२ | दगडू  भिवसन अंगरखे | २८.२.२००५ स्वे.से.नि. | मजूर | किशोर दगडूजी अंगरखे | १.६.२००५ | मुलगा |
| २३ | सर्जेराव रामभाऊ रोकडे | ३१.३.२००५ स्वे.से.नि. | मजूर | सुभाष सर्जेराव रोकडे | ६.८.२००५ | मुलगा |
| २४ | चंद्रभागा सुदाम सोनवणे | ३१.७.२००५ स्वे.से. | मजुरीन | राम सुदाम सोनवणे | ६.८.२००५ | मुलगा |
| २५ | चंद्रभान तानाजी धनेश्वर | २०.७.२००५ स्वे.से. | मजूर | संजय धनेश्वर | ६.८.२००५ | मुलगा |
| २६ | लक्ष्मीबाई बाळा मिसाळ | ३१.७.०५ स्वे.से.नि. | मजुरीन | सुखदेव गाडीवन हिवराळे | ६.८.२००५ | दत्तक मुलगा |
| २७ | बाबु शंकर शरणागत | २९.२.२००४ स्वे.नि. | मजूर | राजु बाबु शरणागत | १०.८.२००५ | मुलगा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २८ | यशोदाबाई हरिभाऊ भूईगड | ५.५.०५ से.नि. | मजूरीन | प्रकाश हरीभाऊ भुईगळ | १०.८.२००५ | मुलगा |
| २९ | सलीमा बी.शेख इस्माइल | ३१.७.२००५ से.नि. | मजूरीन | शेख हबीब शेख इस्माइल | १०.८.२००५ | मुलगा |
| ३० | शांताबाई रतनलाल चावरिया | ३१.७.२००५ से.नि. | स्वीपर | रीना शानंद चावरिया | १०.८.२००५ | सुन |
| ३१ | बाबु बनसोडे | ३१.७.२००५ से.नि. | मजूर | सुनिल बाबु बनसोडे | १८.८.२००५ | मुलगा |
| ३२ | धोडीराम कचरू वेलदोडे | ३१.७.२००५ से.नि. | मजूर | रंजना उत्तम वेलदोडे | १८.८.२००५ | सुन |
| ३३ | हिराबाई सर्जेराव साळवे | २०.८.२००५ से.नि. | मजूरीन | राजु सर्जेराव साळवे | २२.८.२००५ | मुलगा |
| ३४ | शांताबाई पंडीत गडकर | २०.८.२००५ स्वे.से.नि. | मजूरीन | प्रविण पंडीत गडकर | २२.८.२००५ | मुलगा |
| ३५ | गुलाम मुस्तफा गुलाम रसूल | २०.८.२००५ स्वे.से.नि. | मलेरिया मजूर | सय्यद फईम गुलाम मुस्तफा | २२.८.२००५ | मुलगा |
| ३६ | नारायण खोब्राजी म्हस्के | १.६.२००५ स्वे.से.नि. | मजूर | सौ.सुनिता विष्णु म्हस्के | २२.८.२००५ | सुन |
| ३७ | विठ्ठल दामोधर मुगदल | १९.८.२००५ स्वे.से.नि. | मजूर | ज्ञानेश्वर विठ्ठल मुदगल | २२.८.२००५ | मुलगा |
| ३८ | चंद्रकला वामन बावस्कर | ३०.९.२००५ स्वे.से.नि. | मजूर | दिलीप रामदास अहिरे | २४.१०.२००५ | मुलगा |
| ३९ | सांडू कोंडीराम पाखरे | ३०.९.२००५ स्वे.से.नि. | मजूर | अरूण सांडू पाखरे | ४.१०.२००५ | मुलगा |
| ४० | नामदेव देवराव कांबळे | ३०.९.२००५ स्वे.से.नि. | मजूर | उत्तम नामदेव कांबळे | १०.१०.२००५ | मुलगा |
| ४१ | भिकाजी शाहूबा दाभाडे | ३०.९.२००५ स्वे.से.नि. | मजूर | रमेश भिकाजी दाभाडे | ४.१०.२००५ | मुलगा |
| ४२ | भानुदास भाऊराव खंदारे | ३०.९.२००५ स्वे.से.नि. | मजूर | किशोर भानुदास खंदारे | १०.११.२००५ | मुलगा |
| ४३ | विश्वनाथ किसन भालेराव | ३१.७.२००३ से.नि. | मजूर | संजय विश्वनाथ भालेराव | १४.६.२००५ | मुलगा |
| ४४ | सुखदेव श्रीपत आदमाने | ६.१०.२००५ स्वे.से.नि. | मजूर | एकनाथ सुखदेव आदमाने | ९.११.२००५ | मुलगा |
| ४५ | दशरथ किसन कुलकर्णी | ३१.८.२००५ स्वे.से.नि. | मजूर | आनंद किसन कुलकर्णी | १७.१०.२००५ | मुलगा |
| ४६ | भिमाबाई रंगनाथ हिवराळे | २०.१०.२००५ स्वे.से.नि. | मजूर | सतिश रंगनाथ हिवराळे | २१.११.२००५ | मुलगा |
| ४७ | येणूबाई गोपीनाथ | २८.२.२००५ स्वे.से.नि. | मजूर | सतीश लक्ष्मण बनकर | २७.४.२००५ | दत्तक मुलगा |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सफ़ाई मजूर संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या मान्यता उक्त कर्मचारी स्वेच्छा निवृत्ती/रूग्णता सेवानिवृत्ती/नियत वयोमानाने किंवा मृत्युनंतर लाड समितीच्या शिफ़ारसीनुसार दिनांक ३०/०६/९४ च्या शासन निर्णयान्वये व वेळोवेळी शासनाचे सुधारित आदेशानुसार त्यांच्या पाल्यांना अनुकंपावर नियुक्ती देण्याची तरतूद आहे. उक्त शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अर्जांची अनुकंपावर नियुक्ती देण्यासाठी प्रकरणांची छाननी करून सोबतच्या यादीत नमूद केलेली प्रकरणे सोबतच्या यादीतील अनुकंपा तत्वावरील प्रकरणांतील निवड केलेल्या अ.क्र. १ ते ४७ उमेदवारांना मुंबई

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये सफ़ाई मजूर या पदावर नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६६/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सन २००५-०६ या अर्थसंकल्पामधे पृष्ठ क्र. १३५ अ.क्र. २५ मध्ये एन ९ प्रतापनगर आर २७ येथे खुल्या जागेस संरक्षित बांधणे या कामाऐवजी वॉर्ड क्र १७ श्रीकृष्णनगर मध्ये विविध ठिकाणी जी.आय पोल लावणे,फिटींग दुरूस्ती नवीन लाईट लावणे या कामासाठी र.रूपये २.५० (दोन लक्ष पन्नास ) खर्च करण्यास परवानगी मिळावी ही विनंती. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.महेश माळवतकर अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-०६ या अर्थसंकल्पामधे पृष्ठ क्र. १३५ अ.क्र. २५ मध्ये एन ९ प्रतापनगर आर २७ येथे खुल्या जागेस संरक्षित बांधणे या कामाऐवजी वॉर्ड क्र १७ श्रीकृष्णनगर मध्ये विविध ठिकाणी जी.आय पोल लावणे,फिटींग दुरूस्ती नवीन लाईट लावणे या कामासाठी र.रूपये २.५० (दोन लक्ष पन्नास हजार) ची तरतूद वळती करून लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६७/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.३५ पोलीस आयुक्त कार्यालय येथील ग्राऊंडमध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रम व क्रिडा स्पर्धा व २६ जानेवारीचे कार्यक्रम होत असून सदरील ग्राऊंडमध्ये जाण्यासाठी रस्त्यावर डांबरीकरणाचे कामाकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.गजानन बारवाल, श्री.रशिद खान (मामु), सौ.लता दलाल,श्री.संजय शिरसाट

अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे, श्री.वसंत नरवडे पाटील, श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय,
श्री.कैलास गायकवाड, श्री.तरविंदरसिंग धिल्लन.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ पोलीस आयुक्त कार्यालय येथील ग्राऊंडमध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रम व क्रिडा स्पर्धा व २६ जानेवारीचे कार्यक्रम होत असल्यामूळे सदरील ग्राऊंडमध्ये जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र १६८/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र ४८ अविष्कार कॉलनी येथील साईनगर शुभश्री कॉलनी येथे रस्त्याचे कॉक्रीटकरण करण्या संदर्भात अर्थसंकल्प २००५-०६ मध्ये रूपये १० लक्षची तरतूद मान्य होती सदरील निधी साईनगर येथील रस्त्याच्या पुनःर्डाबरीकरण या करीता वापरण्यात यावा.

सुचक : श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर अनुमोदक : श्री.दामोधर शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र ४८ अविष्कार कॉलनी येथील साईनगर शुभश्री कॉलनी येथे रस्त्याचे कॉक्रीटकरण करण्यासाठीची अर्थसंकल्प २००५-०६ मधील तरतूद र.रू.१० लक्ष याऐवजी साईनगर येथील रस्त्याच्या पुनःर्डाबरीकरण करणे या कामासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र १६९/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र ८९ मध्ये मा.आमदार श्री.श्रीकांतजी जोशी यांच्या आमदार निधीतून होणाऱ्या व्यायामशाळेस मा.आ.श्री.शालीग्रामजी राजाराम बसैय्येबंधू असे नांव देण्यात यावे.

सुचक : सौ. विजया किशोर रहाटकर, श्री. भगवान घडमोडे

अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा, श्री.शंशाक विसपूते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र ८९ मध्ये मा.आमदार श्री.श्रीकांतजी जोशी यांच्या आमदार निधीतून होणाऱ्या व्यायामशाळेस मा.आ.श्री.शालीग्रामजी राजाराम बसैय्ये बंधू असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७०/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नक्षत्रवाडी येथे शाळेलगत होत असलेल्या नविन इमारतीमध्ये एक हॉल वाचनालयासाठी उपलब्ध करून देणे तसेच या वाचनालयास मा. कै. रंगनाथ पाटील चोघे यांचे नाव देवून या ठिकाणी विदयार्थ्यासाठी शालेय तसेच महाविदयालयीन व थोर पूरूषाची माहिती असणारे पुस्तके उपलब्ध करून त्वरीत वाचनालय सुरू करावे असा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करावा व त्याची कार्यवाही अमलबजावणी त्वरीत व्हावी. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन बारवाल, सौ. अनिता नंदकुमार घोडेले

अनुमोदक : श्री.सतीश कटकटे, श्री.संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नक्षत्रवाडी येथे शाळेलगत होत असलेल्या नविन इमारतीमध्ये एक हॉल वाचनालयासाठी उपलब्ध करून देणेस तसेच या वाचनालयास मा.कै. रंगनाथ पाटील चोघे यांचे नाव देणेस व या ठिकाणी विदयार्थ्यासाठी शालेय तसेच महाविदयालयीन व थोर पूरूषाची माहिती असणारे पुस्तके उपलब्ध करून वाचनालय सुरू करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की महानगरपालिकेचे वाढलेले कार्यक्षेत्र दैनदिन जनसामान्य नागरिकांचा विविध कामासाठी महानगरपालिकाच्या अधिकाऱ्याशी विविध विभागाशी लोकप्रतिनिधीशी संपर्क येत असतो व ते यासाठी महानगरपालिकेत येतात.

महानगरपालिकेत आल्यानंतर इतर महानगरपालिकेत जसे मार्गदर्शन केंद्र चौकशी कार्यालय स्वागत कक्ष अदयावत प्रकारचे आहे तसेच त्या धर्तीवर अदयावत सर्व सुविधा सह कक्षाची स्थापना करण्या बाबतचा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करावा. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. गजानन बारवाल,सौ. अनिता घोडेले

अनुमोदक : श्री. सतिश कटकटे, श्री. संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेत मार्गदर्शन केंद्र,चौकशी कार्यालय,स्वागत कक्ष अदयावत सर्व सुविधासह कक्षाची स्थापना करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात प्रतापनगर परीसरातील खुली जागेत उदयान विकसीत करणे/बांधणेसाठी र.रू.०२.५ लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे (पान क्र १३५) तथापी सदरील तरतूद अपूरी असल्याने व हे काम आताच करणे आवशक नसल्याने (जागा ताब्यात नसल्याने)या कामासाठी ठेवण्यात आलेली तरतूद र. रू. ०२.५ लाख ज्योतीनगर येथील (प्र.क.८९) **काव्य** उद्यानाच्या उर्वरीत कामाकरीता वापरण्यात यावी . करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ. विजया रहाटकर अनुमोदक : श्री. संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात पान क्र.१३५ वर असलेली र.रू.०२.५ लक्षची तरतुद याऐवजी ज्योतीनगर (प्र.क.८९) येथील **काव्य** उद्यानाच्या उर्वरीत कामाकरीता वापरण्याकरीता लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७३/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की१.केद्रीय प्राथमिक शाळा महानगरपालिका जवाहर कॉ.या शाळेचे नामकरण स्व.पंडीत जवाहरलाल नेहरू केद्रीय प्रा शा.महानगरपालिका औरंगाबाद असे करण्यात यावे.
०२.केद्रीय प्राथमिक शाळा गारखेडा या शाळेचे नामकरण स्व. लालबहादूर शास्त्री केंद्रीय प्रा. शाळा महानगरपालिका औरंगाबाद असे करण्यात यावे.

सुचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : श्रीमती जयश्री सारंग किवळेकर,सौ.दिपाली पाटील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ०१. केद्रीय प्राथमिक शाळा महानगरपालिका जवाहर कॉलनी या शाळेचे नामकरण स्व.पंडीत जवाहरलाल नेहरू केद्रीय प्रा शा. महानगरपालिका औरंगाबाद असे करण्यास आणि ०२.केद्रीय प्राथमिक शाळा गारखेडा या शाळेचे नामकरण स्व. लालबहादूर शास्त्री केंद्रीय प्रा. शाळा महानगरपालिका औरंगाबाद असे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.५३ मध्ये बारी कॉलनी मध्ये नविन ड्रेनेज लाईनसाठी अर्थसंकल्पमध्ये पेज नं.१७९ अ.क्र.२७ वर र.रू.३.०० लाखची तरतूद आहे. परंतू सदरील कामाऐवजी त्याच वार्डात मो.इंदिरानगर मध्ये व वाहेद कॉलनीमध्ये विविध ठिकाणी लाईट दुरूस्ती व कॉंक्रेटींग करण्यासाठी हेड बदलण्यात यावे, ही विनंती.

सूचक : श्रीमती शमशाद बेगम शेख हफिज

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५३ साठी अर्थसंकल्पामध्ये पान नं.१७९ अ.क्र.२७ वर असलेली र.रू.३.०० लाखाची तरतूद याऐवजी त्याच वार्डात मो.इंदिरानगर मध्ये व वाहेद कॉलनीमध्ये विविध ठिकाणी लाईट दुरूस्ती व कॉंक्रेटींग करण्यासाठी लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७५/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.३७ करीता अर्थसंकल्प २००५-२००६ अंतर्गत पाणी पुरवठाच्या कामाकरीता र.रू.१० लक्ष एवढी तरतूद ठेवण्यात आलेली आहे. त्यामधून र.रू.८ लक्ष एवढी रक्कम प्रभाग क्र.३७ मधील गल्ल्याच्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे ह्या कामांकरीता लेखाशिर्षक बदल करण्यात यावे,ही विनंती.

सूचक : श्री.वसंत नरवडे पाटील अनुमोदक : श्री.दामु अण्णा शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३७ करीता अर्थसंकल्प २००५-२००६ मध्ये असलेली र.रू.१०.०० लक्षाच्या ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून र.रू.८.०० लक्ष एवढी रक्कम प्रभाग क्र.३७ मधील गल्ल्याच्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे ह्या कामांकरीता लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्पीय वर्ष २००५-०६ यात अ.क्र.१२ व पान क्र.१७८ मध्ये नारेगांव येथे विविध ड्रेनेज लाईन बदलणे या शिर्षकाखाली अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३.०० लक्ष मंजुर झालेली आहे. यातील रक्कम रूपये २.०० लक्ष पावरलुम येथील कॉंक्रीटीकरणासाठी वापरण्यात यावी, ही विनंती. या प्रस्तावात खालीलप्रमाणे दूरूस्ती करावी.

०१. १ लक्ष रूपये नारेगांव येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन

०२. २ लक्ष रूपये पावलुम येथे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.

कृपया वरीलप्रमाणे लेखाशिर्षक बदलविण्यात यावा, ही विनंती.

सूचक : सौ.दिपाली सुनिल पाटील अनुमोदक : सौ.अजंली कोंडेंकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पीय वर्ष २००५-०६ यात अ.क्र.१२ व पान क्र.१७८ मध्ये नारेगांव येथे विविध ड्रेनेज लाईन बदलणे या शिर्षकाखाली अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३.०० लक्ष असलेली तरतूद खालील कामासाठी वळती करून लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. रू.१.०० लक्ष रूपये नारेगांव येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.

०२. रू.२.०० लक्ष रूपये पावलुम येथे रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७७/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील कलाकारांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा व शहरातीलच नव्हे तर मराठवाड्यातील नवोदित कलाकारांना व्यासपीठ निर्माण व्हावे या उद्देशाने शहरात महापौर चषक एकांकिका स्पर्धा घेण्यात याव्यात.

सदरील स्पर्धा ‘‘गाथा बहुउद्देशीय संस्था,औरंगाबाद‘‘ यांच्या मार्फत आयोजीत करण्यात याव्यात.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री.संजय शिरसाट, सौ.शोभा मिटकर

अनुमोदक : श्री.सलिम पटेल, श्री.भगवान (बापु) घडमोडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील कलाकारांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा व शहरातीलच नव्हे तर मराठवाड्यातील नवोदित कलाकारांना व्यासपीठ निर्माण व्हावे या उद्देशाने शहरात महापौर चषक एकांकिका स्पर्धा घेण्यात याव्यात. सदरील स्पर्धा ‘‘गाथा बहुउद्देशीय संस्था,औरंगाबाद‘‘ यांच्या मार्फत आयोजीत करण्यात याव्यात. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७८/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात प्रथमच राष्ट्रीय पातळीवर सिकंदरअली वज्द मेमोरीयल ट्रस्टच्या वतीने दि.२०.०१.२००६ ते २२.०१.०६ पर्यंत उर्दू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यात चर्चासत्र सांस्कृतिक कार्यक्रम, उर्दू मुशायरा, आणि मराठी-हिंदी-उर्दू त्रैभाषिक कवि सम्मेलन व शहरातून शैक्षणिक फेरी (रॅली) काढण्यात येणार आहे. यासाठी देशाच्या विविध भागातून साहित्यिक,लेखक,विद्वान येणार आहेत. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात विचारवंत सहभागी होणार आहेत. महानगरपालिकाचा अशा कामात नेहमीच योगदान राहिलेला आहे व अशा कामांसाठी अर्थसहाय्य देत आहे. त्याच धर्तीवर या सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कामासाठी आयोजकास रू.५०,०००/- चे अर्थसहाय्य देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.मुजीब आलमशाह खान अनुमोदक : श्री.हाजी शेरखान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात प्रथमच राष्ट्रीय पातळीवर सिकंदरअली वज्द मेमोरीयल ट्रस्टच्या वतीने दि.२०.०१.२००६ ते २२.०१.०६ पर्यंत आयोजीत उर्दू मेळाव्याचे कामासाठी आयोजकास रू.५०,०००/- चे अर्थसहाय्य देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५३ मध्ये बारी कॉलनी मध्ये नविन ड्रेनेज लाईनसाठी अर्थसंकल्पात पान क्र.१७९ वर अ.क्र.२७ वर रक्कम रूपये ३.०० लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु या कामा ऐवजी याच वार्डातील मोहल्ला इंदिरानगरमध्ये व वाहेद कॉलनीमध्ये विविध ठिकाणी लाईट दुरूस्ती व कॉक्रेटींग करण्याकरिता हेड बदलण्यात यावे, करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक :श्रीमती शमशाद बेगम शेख हफीज अनुमोदक:१.श्री.हाजी शेरखान,२.श्री.अशरफ मोतीवाला

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५३ साठी बारी कॉलनी मध्ये नविन ड्रेनेज लाईनसाठी अर्थसंकल्पात पान क्र.१७९ वर अ.क्र.२७ वर असलेली रक्कम रूपये ३.०० लाखाची तरतूदी ऐवजी याच वार्डातील मोहल्ला इंदिरानगर व वाहेद कॉलनीमध्ये विविध ठिकाणी लाईट दुरूस्ती व कॉक्रेटींग करणेसाठी लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८०/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या वॉर्डात मोहल्ला शहाबाजार गटार दुरूस्ती करणे पृष्ट क्र.१२७ अ.क्र.१० वर १ लाखची तरतूद असून हे काम करणे आवश्यक नसल्यामूळे या ऐवजी हे काम विद्युतसाठी शहाबाजार येथे विविध ठिकाणी पथदिवेची आवश्यकतामूळे व अत्यंत गरजेचे असल्याने अंदाजपत्रक रक्कम वर्ग करण्यात यावे, यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : सौ.नजमा युनूस कुरैशी अनुमोदक : सौ.शेख शमशाद बेगम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला शहाबाजारकरीता गटार दुरूस्ती करणेसाठी पृष्ट क्र.१२७ अ.क्र.१० वर असलेली र.रू.१.०० लाखाची तरतूद ऐवजी शहाबाजार येथे विविध ठिकाणी पथदिवे लावणेसाठी लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८१/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.५७ मधील हौदाचे सुशोभिकरणसाठी अर्थसंकल्पात पान क्र.१५२ अ.क्र.२२ वर ५ लक्षाची तरतूद करण्यात आली होती. त्याऐवजी जूना मोंढा झोन ऑफिस येथील चौकात हायमास्ट लाईट बसविण्यात यावे.

सूचक : श्री.तुपे त्र्यंबक अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.५७ करीता अर्थसंकल्पात पान क्र.१५२ अ.क्र.२२ वर असलेली र.रू.५.०० लक्षाची तरतूद ऐवजी जूना मोंढा झोन ऑफिस येथील चौकात हायमास्ट लाईट बसविण्याकरीता लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८२/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.५७ तक्षशिलानगर (स्लम) भागात पान क्र.१२६ अ.क्र.६ वर जलवाहीनी टाकण्यासाठी २ लक्षाची तरतुद ठेवण्यात आली होती त्याऐवजी वॉर्ड क्र.५७ मधील विविध भागात (स्लम) येथे ड्रेनेज लाईन टाकणे, दुरूस्ती,अप्रुटींग करणेसाठी वळती करण्यात यावे.

सूचक : श्री.तुपे त्र्यंबक अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.५७ करीता अर्थसंकल्पात पान क्र.१२६ अ.क्र.६ वर असलेली र.रू.२.०० लक्षाची तरतुद ऐवजी वॉर्ड क्र.५७ मधील विविध भागात (स्लम) येथे ड्रेनेज लाईन टाकणे, दुरूस्ती,अप्रुटींग करणेसाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८३/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.५७ मधील तक्षशिलानगर (स्लम) भागातील नविन ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अर्थसंकल्पात पान क्र.१८० अ.क्र.७१ वर ५ लक्षाची तरतूद ठेवण्यात आली होती, त्याऐवजी वार्ड क्र.५७ मधील भवानीनगर येथील ड्रेनेजलाईन अप्रुटींग करणे व दुरूस्त करण्यासाठी वळती करावी.

सूचक : श्री.तुपे त्र्यंबक अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ करीता अर्थसंकल्पात पान क्र.१८० अ.क्र.७१ वर असलेली र.रू.५.०० लक्षाची तरतूद ऐवजी वार्ड क्र.५७ मधील भवानीनगर येथील ड्रेनेज लाईन अप्ग्रुटींग करणे व दुरूस्त करण्यासाठी लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.१८४/१९ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.५७ मधील स्लम भागात शौच्छालय दुरूस्त करण्यासाठी पान क्र.१३६ अ.क्र.१५ वर २.५ लक्षाची तरतूद ठेवण्यात आली होती त्यांचे अंदाजपत्रक १.५ लक्ष एवढे तयार करण्यात आले होते, त्यापैकी उर्वरित रक्कम १ लक्ष याच भागातील रस्त्यावर जी.आय.पोल फिटींगसह व दोन टु सेट लावण्याकरीता वळती करण्यात यावी.

उक्त अ.क्र.१ ते ४ प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.तुपे त्र्यंबक अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ करीता अर्थसकल्पात पान क्र.१३६ अ.क्र.१५ वर असलेली र.रू.२.५ लक्षाच्या उर्वरीत र.रू.१.०० लक्ष याच भागातील रस्त्यावर जी.आय.पोल फिटींगसह व दोन टु सेट लावण्याकरीता वापरण्यास व लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच **राष्ट्रगीताने** सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.